cmyk

## संपादकीय

### मुख्यमंत्र्यांचा इशारा मंत्रीगण गांभिर्याने घेतील का?

देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यापासून राज्याचा कारभार कागदावर नाही, तर जनतेत उतरून करण्यास त्यांनी सुरुवात केली आहे. एकीकडे खातेवाटपावरून मित्रांचे रुसवे-फुगवे काढताना दुसरीकडे प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बैठका, विकासकामांच्या योजना यावर मुख्यमंत्री फडणवीसांचे काम सुरू आहे. त्यात मंत्रिमंडळ विस्तार झाला तरी अपेक्षित खाती न मिळाल्याने नाराजीचे धुमारे अजूनही सुरूच आहेत. त्यातून कारभार स्वीकारण्यास विलंब होत गेला.

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

D.S.Nagargoje 8908165555 9175606738
A.S.Nagargoje 9284872700 8007003550
बालाजी बॅटरी हाऊस
सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस
आमच्याकडे सर्व प्रकारच्या बॅटरी योग्य दरात मिळतील.
पत्ता : काकु-नाना हॉस्पिटल समोर, जालना रोड, बीड.

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-२५२ | शनिवार, दि.४ जानेवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रुपये

# तुरीचा भाव पडल्याने चिंता !

## सरकारने तुरीची खरेदी वेळेत आणि हमीभावाने करण्याची शेतकऱ्यांची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

**तुरीचा भाव मागील ६ महिन्यांत ५ हजाराने आणि एकाच महिन्यात २ हजार ५०० रुपयाने कमी झाला. आवकेचा दबाव वाढून दर आणखी कमी होण्याची भीती आहे. त्यामुळे सरकारच्या हमीभाव खरेदीचा शेतकऱ्यांना आधार हवा आहे. पण सोयाबीनप्रमाणे तुरीचे होऊ नये यासाठी तातडीने खरेदी जाहीर करून नोंदणी सुरु करावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत. केंद्राने ५ राज्यांमध्ये ९ लाख ६६ हजार टन खरेदीचे उद्दीष्ट जाहीर केले. पण महाराष्ट्रात अद्यापही खरेदीचे उद्दीष्ट जाहीर झाले नाही.**

देशात तुरीच्या भावात जून २०२३ पासून तेजीला सुरुवात झाली. त्याचे कारण होते कमी पाऊस आणि कमी लागवड. तेव्हापासून सुरु झालेल्या तेजीने मजल दरमजल करत जून २०२४ मध्ये १२ हजार ५०० रुपयांचा टप्पा गाठला. कारण गेल्या हंगामात तुरीची लागवड कमी होऊन उत्पादनात मोठी घट झाली होती. पण यंदा मान्सून चांगला बरसला. लागवडही १४ टक्क्यांनी वाढली. त्यामुळे चांगल्या उत्पादनाची चर्चा सुरु आहे. देशात यंदा तुरीचे उत्पादन वाढण्याची शक्यता असल्याने नवा माल



बाजारात दाखल होण्याच्या आधीच बाजारात नरमाई यायला सुरुवात झाली. जून महिन्यातील मोठ्या तेजीनंतर बाजारात भाव कमी होत गेले. डिसेंबर महिन्यात देशातील काही बाजारात नवी तूर दाखल झाल्यानंतर दर आणखी कमी झाले. सध्या बाजार समित्यांमध्ये तुरीला ७ हजार ते ७ हजार ५०० रुपयांचा भाव मिळत आहे. म्हणजेच जून महिन्यातील उच्चांकी भावाचा विचार करता सध्याचा भाव ५ हजाराने कमी आहे. तर नोव्हेंबरमधील भावाचा विचार केला तर सध्या २ हजार ५०० रुपये कमी भाव आहे.

तुरीचा भाव मागील सहा महिन्यात ५ हाजाराने आणि एकाच महिन्यात २ हजार ५०० रुपयाने कमी झाला. पान २ वर

### शेतकऱ्यांना सोयाबीनचा वाईट अनुभव

सोयाबीनच्या हमीभाव खरेदीत अनेक अडचणी असल्याने बहुतांशी शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा किमान ९०० रुपये कमी भावात माल विकावा लागला. नोंदणी वेळेत होऊ शकत नाही, नोंदणीनंतर खरेदीसाठी महिना-महिना थांबावे लागत आहे. यामुळे शेतकऱ्यांना नाईलाजाने खुल्या बाजारात सोयाबीन विकावी लागत आहे. तूर खरेदी करताना सरकारने या अडचणी सोडविणे आवश्यक आहे.

# बीडचे पालकमंत्रिपद अजितदादांकडे ?

### मुंडे बहिण -भावाचा पत्ता कट?, महायुतीसह विरोधकांचाही विरोध



**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या मस्साजोगचे संरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर बीडचा पालकनमंत्री कोण होणार याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. वाल्मिक कराड यांच्यावर आरोप होत असल्याने धनंजय मुंडे यांचा पत्ता कट झाल्याची माहिती असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे यांच्यात बीडच्या पालकमंत्री पदाबाबत चर्चा झाल्याचे म्हटले जात असून मुंडे बहिण-भावाचा पत्ता कट केला जाणार असून अजित पवार हेच बीडचे पालकमंत्री होणार असल्याची विश्वसनीय माहिती समोर आली आहे.

सरपंच संतोष देशमुख यांचे हत्या प्रकरण समोर आल्यानंतर धनंजय मुंडे यांच्यावर आरोप होऊ लागले. धनंजय मुंडे यांना पालकमंत्री करू नये अशी मागणी विरोधकांनी केली. अशातच पान २ वर

# दोन दिग्गज एकाच मंचावर!

## शरद पवार, छगन भूजबळ एकत्र येणार का ? राजकीय चर्चेला उधाण



### भर मंचावर शरद पवारांनी संदेश लिहून दिला, छगन भुजबळांनी गुपचूप वाचला

सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने पुण्यात आज (दि.३) त्यांच्या पुतळ्याचे अनावर करण्यात आले. यावेळी शरद पवारांनी माजी मंत्री छगन भुजबळांना पत्रिकेवर एक लिखित संदेश दिला, त्यानंतर दोघांमध्ये काही सेकंदाचा संवादही झाला अन् दोघे एकमेकांकडे हसूही लागले. मंचावर दोघे एकमेकांच्या बाजूला बसले होते. मात्र मंचावर आल्यापासून दोघांनी एकमेकांकडे पाहणेही टाळले होते. मात्र त्याचवेळी पवारांनी पत्रिकेवर दोन ओळी मजकूर लिहिला. मग भुजबळांच्या हातातील पत्रिका काढून घेतली अन स्वतःच्या हातातील पत्रिका त्यांच्या हातात सोपवली. मग पवारांनी भुजबळांना खुणावले अन वीस मिनिटांनी दोघांमध्ये काही सेकंद संवाद झाला. त्यानंतर दोघे एकमेकांकडे पाहून हसलेही. मंचावरील या घडामोडींमुळे राजकीय वर्तुळात चर्चा रंगल्या आहेत.

**पुणे । प्रतिनिधी**

**राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार आणि छगन भुजबळ राज्यातील हे दोन दिग्गज नेते विधानसभा निवडणुकीनंतर पहिल्यांदाच एकत्र आले. मंत्रिपद न मिळाल्यामुळे छगन भुजबळ काही दिवसांपूर्वी कमालीचे नाराज झाले होते. या भेटीमुळे भुजबळ हे शरद पवारांसोबत एकत्र येणार का ? अशी चर्चा राजकीय चर्चा रंगली आहे.**

पुण्यातील चाकण बाजार समितीमध्ये शुक्रवारी (दि.३) सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याचा अनावरण सोहळा पार पडला. यावेळी राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार आणि माजी मंत्री छगन भुजबळ उपस्थित होते. सावित्रीबाई फुलेंच्या पुतळ्याचे अनावरण पवारांच्या हस्ते पार पडणार होते. तर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री छगन भुजबळ होते. त पान २ वर

### भुजबळांसाठी पवारांची दीड तास वेटींग

शरद पवार हे या कार्यक्रमासाठी चार वाजताच पोहचले होते. मात्र,भुजबळ तब्बल दीड तास उशिरा आल्याने पवारांना दीड तास ताटकळत बसावे लागल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे वेळेला महत्व देणाऱ्या पवारांना साहजिकच थोडा का होईना राग आला असेल याची कल्पना छगन भुजबळांना आली असावी, त्यामुळे त्यांनी मंचावर आल्यापासून पवारांशी बोलणे टाळले असावे, अशी चर्चा होत आहे.

# लोकवर्गणीतून सरपंच देशमुख कुटुंबाला ४४ लाखांची मदत सुपुर्द

### आ. प्रकाश सोळंके यांची माहिती; आणखी वर्गणी जमा होणार

**माजलगाव । प्रतिनिधी**

बीडच्या केज तालुक्यातील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा तपास सुरू असून २५ दिवसांनंतरही आरोपी फरार आहेत. देशमुख कुटुंबावर दुखाचा डोंगर कोसळला असून त्यांना अशा संकटकाळी मदत व्हावी यासाठी लोकवर्गणी जमा केली. त्यातून जमा झालेले ४४ लाख रुपये देशमुख कुटुंबाला आ. प्रकाश सोळंके यांच्या हस्ते



शुक्रवारी सुपुर्द करण्यात आले. आ. सोळंके यांनी पोलिसांच्या कार्यपद्धतीवरूनही प्रश्न उपस्थित केले आहेत आणि आरोपींना कठोर शिक्षा मिळावी अशी मागणी केली आहे.

बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची अतिशय निर्घृणपणे हत्या करण्यात आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण राज्य हादरले पान २ वर

# सरपंच देशमुख हत्या प्रकरणात टॉप सिक्रेट्स

### आ.सुरेश धस यांचे नवे गौप्यस्फोट

**बीड । प्रतिनिधी**


**संतोष देशमुख खून प्रकरणाच्या तपासाच्या बाबतीत चौकशी करण्यासाठी पोलिस अधिक्षक नवणीत कॉंवत यांची भेट घेतली. तपासाबाबत विचारणा केली असता त्यांनी काही टॉप सिक्रेट्स असून ते सांगता येत नाहीत, असे सांगितले. त्यामुळे या प्रकरणात टॉप सिक्रेट्स असल्याचा गौप्यस्फोट आ. सुरेश धस यांनी पत्रकार परिषद घेऊन केला.**



भाजप आमदार सुरेश धस यांनी संतोष देशमुख हत्या प्रकरणी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी महत्त्वाचे गौप्यस्फोट केले आहेत. सुरेश धस यांनी एसपी नवनीत कॉवत यांची भेट पान २ वर

# मुंबईच्या डॉनलोकांपेक्षा कराडची जास्त चलती

### आ. जितेंद्र आव्हाड मोठे विधान; पोलिसांपेक्षाही कराडचीच दादागिरी





**ठाणे । प्रतिनिधी**

**मुंबईतले सगळे डॉन मी बघितले असून त्यांना सुध्दा पोलिसांची भीती होती. मात्र वाल्मिक कराडला पोलिसांची कसलीच भीती नाही. मुंबईच्या डॉनलोकांपेक्षाही कराडची जास्त चलती असल्याचे या सगळ्या प्रकारावरुन दिसत असल्याचे मोठे विधान आ. जितेंद्र आव्हाड यांनी केले आहे.**

पुढे बोलताना आव्हाड म्हणाले, मला कराडचे कौतुक याच्यासाठी वाटते की, मी हे सगळे १९८९ सालापासून बघत आहे. दाऊद, छोटा राजन, बाबू देशी, अरुण गवळी ही मुंबईतली मोठी नावं आहेत. त्यांची एवढी चालत नाही, एवढी ह्या कराडची चालत पान २ वर

### वाल्मिक कराडकडून मदतनीस अन् मशीनची मागणी

बीड -खंडणी गुन्ह्यातील आरोपी वाल्मिक कराडकडून उपचारबाबत विनंती करणारा एक अर्ज केज सत्र न्यायालयात दाखल केला आहे. आपल्याला स्लीप ॲप्नीया नावाचा आजार असल्याचा दावा वाल्मिकीने केला आहे. हा आजार असलेल्या रुग्णाला ऑटो सीपॅप ही मशीन झोपताना लावली जाते. ही मशीन कोठडीत असताना आपल्याला दिली जावी अशी मागणी वाल्मिक कराडने केली आहे. एवढ्यावरच न थांबता कराडने ही मशीन लावण्यासाठी २४ तास एक मदतनीस हवा असल्याचेही या विनंती अर्जात म्हटले आहे. स्लीप ॲप्नीयावरील उपचारासाठी वापरली जाणारी सीपॅप मशीन चालवण्यासाठी आपल्याला सीआयडी कोठडीत २४ तास मदतनीस देण्याची कराडची मागणी आहे. यापूर्वीच कराडने एक विनंती पत्र लिहून आधी जेवायला खिचडी द्यावी अशा पद्धतीची मागणी केली होती. त्यामुळेच आता कराडच्या इच्छांची यादी वाढतच चालल्याचे चित्र दिसत आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३ जानेवारी २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २.०० क्विंटल | २,९४५ | ३,३६० | ३,१५२ |
| ज्वारी/हायब्रिड: ३३.०० क्विंटल | १,९०१ | २,५०० | २,१९३ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : ५३.५० क्विंटल | ६,६०१ | ७,५५० | ७,२७१ |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,४५१ | ६,४५१ | ६,४५१ |
| बाजरी: १३.५० क्विंटल | २,००० | ४,७०० | ३,१२४ |
| मुग : २.०० क्विंटल | ६,००१ | ७,००१ | ६,५०१ |
| सोयाबीन:१३१.०० क्विंटल | ३,९०० | ४,२०० | ४,०९२ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ४,७०० | ५,५०० | ५,१०० |



# १० वर्षांत ४ कोटी गरीब कुटुंबाना दिली कायमस्वरुपी घरे - पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

**मी शीशमहल बांधू शकलो असतो. मात्र, गरीब कुटुंबांसाठी कायमस्वरुपी घरे बांधण्याचे स्वप्न होते. १० वर्षांत ४ कोटी गरीब कुटुंबाना कायमस्वरुपी घरे दिली. पण स्वतःचे घर कधीच बांधले नाही, अशी खोचक टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांच्यावर केली.**


शुक्रवारी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीत ४ हजार ५०० कोटी रुपयांच्या विविध पान २ वर

# अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे ॲक्शन मोडवर

## डिसेंबर महिन्यात धान्यापासून वंचित राहिलेल्या शिधापत्रिका धारकांच्या बाबत घेतला आढावा

**परळी वै.। प्रतिनिधी**

**डिसेंबर महिन्यातील धान्य वितरणाच्या अनुषंगाने राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे आज ॲक्शन मोडवर आले आहेत. डिसेंबर महिन्यात राज्यात प्राप्त नियतनाच्या एकूण ९२.०९% धान्याचे वितरण झाले असून, उर्वरित वितरणामध्ये आलेल्या अडचणींच्या अनुषंगाने आज धनंजय मुंडे यांनी सबंध राज्याच्या पुरवठा विभागाची व्हीसीद्वारे बैठक घेतली.**



ई - पॉस मशीन वरील अडचणी, पोर्टलचे सर्वर डाऊन, यांसह विविध अडचणींची तसेच

### प्रत्येक जिल्ह्यातील धान्य वितरणाची वस्तुनिष्ठ माहिती घेऊन १००% वितरणासाठी केल्या सूचना

धान्य वितरणाची जिल्हा निहाय वस्तुनिष्ठ आकडेवारी धनंजय मुंडे यांनी त्या त्या जिल्ह्याच्या जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडून जाणून घेतली. ठाण्यात सर्वाधिक ९८.५९ तर धुळे जिल्ह्यात सर्वात कमी ८१.६९% इतके धान्य वितरण डिसेंबर महिन्यात झाले असून ही आकडेवारी शंभर टक्क्यांकडे घेऊन जाण्यासाठी ऑनलाईन व अन्य तांत्रिक अडचणी दूर करण्यासंदर्भात धनंजय मुंडे यांनी विभागाला निर्देश दिले असून या संदर्भात सर्व संबंधितांची पुढील आठवड्यात आणखी एक बैठक घेणार असल्याचे धनंजय मुंडे यांनी विभागाला निर्देश दिले आहेत. सर्वर डाऊन असणे, किंवा अन्य कारणांनी ज्या ज्या जिल्ह्यांमध्ये विविध योजनेतील लाभार्थींना धान्य वितरण डिसेंबर महिन्यात होऊ शकले नाही त्यांना या महिन्यांमध्ये मुदतवाढ देण्याबाबतचे प्रस्ताव तातडीने देण्याबाबतही धनंजय मुंडे यांनी संबंधित जिल्ह्यांना निर्देश दिले आहेत. भंडारा जिल्ह्यातील उर्वरित साखर उपलब्ध करून देणे त्याचबरोबर नागपूर विभागातील पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# मुख्यमंत्र्यांचा इशारा मंत्रीगण गांभिर्याने घेतील का?

देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यापासून राज्याचा कारभार कागदावर नाही, तर जनतेत उतरून करण्यास त्यांनी सुरुवात केली आहे. एकीकडे खातेवाटपावरून मित्रांचे रुसवे-फुगवे काढताना दुसरीकडे प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बैठका, विकासकामांच्या योजना यावर मुख्यमंत्री फडणवीसांचे काम सुरू आहे. त्यात मंत्रिमंडळ विस्तार झाला तरी अपेक्षित खाती न मिळाल्याने नाराजीचे धुमारे अजूनही सुरूच आहेत. त्यातून कारभार स्वीकारण्यास विलंब होत गेला. यातून काही मंत्री आपल्याला अपेक्षित खाती न मिळाल्याने नाराजी दाखविण्याचा प्रयत्न करत होते. त्यामुळे महाराष्ट्रीय जनतेमध्ये महायुती सरकारबाबत वेगळा संदेश जात असल्याचा व यातून महायुती सरकारची वेगळीच प्रतिमा जनसामान्यांमध्ये निर्माण होत असल्याचा धोका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वेळीच ओळखला. यामुळे एक-दोन दिवसांमध्ये मंत्रीपदाचा कार्यभार स्वीकारा, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांना द्यावा लागला.

एकीकडे राजकीय रुसवा-फुगवीमुळे मंत्रिमंडळ विस्तार, शपथविधी, खातेवाटप, मंत्र्यांना करण्यात आलेले दालन आणि बंगल्याचे वाटप याबाबतही जनतेमध्ये कुजबुज सुरू झाली होती. मात्र महायुती सरकारमध्ये असलेल्या शिवसेनेच्या अनेक मंत्र्यांना बंगले न मिळाल्यामुळे त्यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली आहे. त्यांना बंगले हवे असताना राहण्यास साधा फ्लॅट देण्यात आला आहे. आम्ही फ्लॅटमध्ये का राहायचे? आम्हाला राहण्यास बंगले हवे होते. महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपाच्या मंत्र्यांना बंगले देण्यात आलेले असताना मात्र आम्हाला फ्लॅट दिले आहेत, असे म्हणत शिवसेनेच्या मंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. या कारणामुळेच शिवसेनेच्या काही मंत्र्यांनी मंत्रीपदाचा पदभार स्वीकारला नसल्याची चर्चा आहे, तर काही मंत्र्यांना मनासारखे खाते न मिळाल्यामुळे, मनासारखे दालन आणि बंगला न मिळाल्यामुळे त्यांनी अद्यापपर्यंत मंत्रीपदाचा पदभार स्वीकारला नसल्याची राजकीय वर्तुळात तसेच सर्वसामान्यांमध्ये जोरदार चर्चा सुरू झाली आहे. मुख्यमंत्र्यांना आपल्या जबाबदारीची जाणीव आहे. राज्यात कोणती अनपेक्षित घटना घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास महाविकास आघाडी त्याचे भांडवल करून जनसामान्यांची सहानुभूती मिळविण्याचा धोका आहे. त्यात कल्याण, मुंबई, बीड, राजगुरुनगरमध्ये घडलेल्या घटनांनी महाराष्ट्राचे राजकीय व सामाजिक वातावरण ढवळून निघाले आहे. बीडच्या घटनेने तर राज्यातील मंत्री धनंजय मुंडे यांच्यावरून सरकारकडे संशयाने पाहिले जात आहे. बीड व सभोवतालच्या भागात मोर्चे निघाले आहेत, निदर्शने करण्यात आली आहेत. मोठा आका, छोटा आका हे शब्द आता महाराष्ट्रीय जनतेलाही परिचयाचे झाले आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांना १०० दिवसांचा रोड मॅप तयार करायचा आहे. या १०० दिवसांत प्रत्येक खात्याचा संबंधित मंत्र्याकडून १०० दिवसांचा आढावा मुख्यमंत्री घेणार आहेत. म्हणून या कृती आराखड्यासाठी आपण लवकरच कामाला लागले पाहिजे. यामुळे मंत्रीपदाचा पदभार न स्वीकारलेल्या मंत्र्यांनी लवकरच पदभार स्वीकारून कामाला लागावे, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

पदभार स्वीकारण्याचा इशारा त्यांनी दिलाच आहे, या इशाऱ्याचे गांभीर्य न ओळखणाऱ्या मंत्र्यांचे पद काढून घेण्यासही देवेंद्र फडणवीस मागे-पुढे पाहणार नाहीत. त्यामुळे इशाऱ्याचे गांभीर्य ओळखून मंत्री कारभार हाती घेतील व फडणवीसांना अपेक्षित असलेला कारभार करतील अशी अपेक्षा भाजपाच्या पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. एसटीचे प्रकरण काढून देवेंद्र फडणवीस यांनी एकाच बाणातून अनेक निशाणे लावल्याने मित्रपक्षांतील सहकाऱ्यांना सूचित व गर्भित इशारा दिला आहे. आमदार मोठ्या संख्येने निवडून आल्याने व मंत्रिमंडळाची सदस्य संख्या ४३ पर्यंतच सीमित असल्याने अनेक मातब्बरांना मंत्रिमंडळात स्थान मिळालेले नाही. अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून छगन भुजबळांना, भाजपाकडून सुधीर मनगुंटीवारांना तसेच शिवसेनेकडून केसरकरांना मंत्रिमंडळात स्थान मिळाले नाही. मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने अनेक प्रस्थापितांकडून नाराजीचा सूरही आळविण्यात आला आहे. आपल्या आमदारांची समजूत काढताना महायुतीमधील नेतेमंडळींना तारेवरची कसरत करावी लागली आहे. भुजबळांचे नाराजीपर्व महाराष्ट्राने जवळून पाहिले आहे. त्यातच शिवसेनेतील आमदारांची नाराजी शमविण्यासाठी एकनाथ शिंदे यांना अडीच वर्षांच्या फॉर्म्यूल्यावरही विचार करावा लागला आहे. मंत्रिमंडळामध्ये स्थान मिळालेले आमदार मिळालेल्या संधीचे सोने करण्याचे सोडून महत्त्वाचे खाते मिळाले नाही, केबिन मिळाले नाही, बंगला मिळाला नाही म्हणून पदभार स्वीकारण्यास विलंब करून आपली नाराजी व्यक्त करण्याचा प्रकार मुळातच चुकीचा आहे. ते कार्यभार स्वीकारण्यास विलंब करून महाराष्ट्रीय जनतेच्या अपेक्षापूर्तींना विलंब करत आहेत. त्यांच्या रुसव्या-फुगव्याहून, नाराजीहून महाराष्ट्र हित महत्त्वाचे असल्याने मुख्यमंत्री फडणवीसांना अखेरीस भात्यातील ब्रह्मास्त्र काढावे लागले आहे.

# जयभवानी व जगदंबा शिक्षण संस्थेचाक्रिडा महोत्सव ५ ते १२ जानेवारी दरम्यान होणार-रणवीर पंडित

## १८०० खेळाडूंना किटचे मोफत वाटप

**गेवराई । प्रतिनिधी**

**जयभवानी व जगदंबा शिक्षण संस्थेच्या अंतर्गत यावर्षीही भव्य क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून दिनांक ५ जानेवारी ते १२ जानेवारी दरम्यान महोत्सव होणार आहे. कबड्डी स्पर्धा खो-खो स्पर्धा, व्हॉलीबॉल स्पर्धा बॅडमिंटन स्पर्धा, बुद्धिबळ स्पर्धा आणि अथलेटिक्स स्पर्धा होणार असून होणार आहेत. क्रीडा महोत्सवातून गेवराई तालुक्याच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आणि क्रीडा प्रेमींना आनंदाची पर्वणी ठरणार आहे अशी माहिती शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर अमरसिंह पंडित यांनी दिली. यावेळी जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या १८०० खेळाडूंना मोफत किटचे वाटप करण्यात आले.**

शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर अमरसिंह पंडित यांच्या संकल्पनेतून जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या अंतर्गत असणाऱ्या विविध शाळेच्या माध्यमातून क्रिडा महोत्सवाचे गेल्या दोन वर्षापासून आयोजन करण्यात येत आहे, हे तिसरे वर्ष असून रविवार दिनांक ५ जानेवारी ते रविवार दिनांक १२ जानेवारी पर्यंत हा महोत्सव होणार आहे. याबाबतची माहिती महोत्सवाचे आयोजक रणवीर पंडित यांनी दिली. यावेळी बोलताना ते म्हणाले की, गेवराई तालुक्याच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आपल्या हक्काचे मैदान मिळावे आणि त्यांच्या क्रीडा गुणांना वाव मिळावा म्हणून या क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थेच्या विविध शाळेमध्ये या स्पर्धा होणार आहेत. दिनांक ५ जानेवारी रोजी क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन विविध मान्यवरांच्या उपस्थित गेवराई शहरातील शारदा विद्या मंदिर येथे होणार आहे. यावेळी मुलींच्या गटात कबड्डी स्पर्धा होतील. मुले आणि मुलींच्या गटात बुद्धिबळाच्या स्पर्धा होणार आहेत. दिनांक ६ जानेवारी रोजी शारदा विद्या मंदिर येथेच मुलाच्या गटात कबड्डीच्या स्पर्धा होतील. दिनांक ७ जानेवारी रोजी माध्यमिक विद्यालय




तलवाडा येथे मुला मुलीच्या गटात व्हॉलीबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. दिनांक ८ जानेवारी रोजी जयभवानी विद्यालय गढी येथे मुलीच्या गटात खो-खो स्पर्धा आणि बॅडमिंटन स्पर्धा तर ९ जानेवारी रोजी जयभवानी विद्यालयाच्या मैदानावरच मुलांच्या गटात खो-खो आणि बॅडमिंटन स्पर्धा संपन्न होतील. दिनांक १० आणि ११ जानेवारी रोजी शिव शारदा पब्लिक स्कूलच्या मैदानावर मुला मुलींच्या गटात अथलेटिक्स स्पर्धा होतील १२ जानेवारी रोजी अथलॅटिक्स स्पर्धेचे अंतिम सामने होतील. माजी आमदार अमरसिंह पंडित, विद्यमान आमदार विजयसिंह पंडित, जयभवानी शिक्षण संस्थेचे सचिव जयसिंग पंडित यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करुन क्रीडा महोत्सवाचा शानदार समारोप होईल. दरम्यान रणवीर पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली जयभवानी जगदंबा शिक्षण संस्थेचे सर्व क्रीडा शिक्षक क्रीडा महोत्सव यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत असून आज रणवीर पंडित यांच्या हस्ते संस्थील १८०० विद्यार्थी खेळाडूंना किटचे वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, सह प्रशासन अधिकारी प्रा. काशिनाथ गोगुले यांच्यासह संस्थेचे सर्व मुख्याध्यापक, प्राध्यापक आणि शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आष्टी नगरपंचायतच्या स्वीकृत नगरसेवकपदी अरुण निकाळजे,बाळासाहेब घोडके यांची बिनविरोध निवड

## आ.सुरेश धस यांनी अनुसूचित जातीला न्याय दिल्याने मानले आभार

**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी नगरपंचायतच्या नामनिर्देशित स्वीकृत सदस्यपदासाठी दोन रिक्त झालेल्या जागेसाठी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये आ.सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली दोन्ही ही खंदे समर्थक असलेले रिपाई जिल्हा उपाध्यक्ष तथा नेते अरुण निकाळजे व सुधीर (बाळासाहेब) घोडके यांची स्वीकृत नगरसेवकपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. आष्टी नगरपंचायत येथे विशेष सभेचे आयोजन केले आहे या विशेष सभेचे पिठासीन अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी पाटोदा श्रीमती वसिमा शेख यांनी तर बाळ दत्त मोरे प्रभारी मुख्याधिकारी नगरपंचायत आष्टी हे सहाय्यक अधिकारी म्हणून काम पाहिले.**



आष्टी मतदारसंघाचे आ.सुरेश धस हे सर्व घटकांना सोबत घेऊन जाणारे नेतृत्व असलेले असल्याने आम्हाला संधी दिल्याने आम्ही या संधीचे नक्की सर्वसामान्य दिन दलित वंचित घटकांना न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करू असे नवनिर्वाचित नगरसेवकांनी आपले भावना व्यक्त केली तसेच दोन्ही स्वीकृत नगरसेवक पदावर अनुसूचित जातीला न्याय दिल्याने आमदार सुरेश धस यांचे आभार मानले. नवनिर्वाचित नगरसेवक यांचे दूरध्वनीवरून आमदार सुरेश धस,रिपाई चे नेते पप्पु कागदे, युवा नेते जयदत्त धस,सागर धस यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी नवनिर्वाचित स्वीकृत नगरसेवकांचे उपविभागीय अधिकारी वसीमा शेख ,प्रभारी मुख्याधिकारी बाळदत्त मोरे,नगराध्यक्ष जिया बेग,उपनगराध्यक्ष शैलेश सहस्रबुद्धे,ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे,गटनेते किशोर झरेकर,माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, गणेश शिंदे,सादिक कुरेशी,राम मधुरकर,सरपंच परिवंत गायकवाड,सचिन लोखंडे,डॉ.आंबेडकर फोरमचे यशवंत खंडागळे,दीपक निकाळजे, राजू निकाळजे,नगरसेवक शरीफ शेख,सुरेश वारंगुळे, शेख शमीम,भारत मुरकुटे,इर्शान खान, सुनिल रेडेकर,अक्षय धोंडे, ज्ञानदेव राऊत,शाम वाल्हेकर,महादेव शिखरे,पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे,पत्रकार शरद रेडेकर, पत्रकार सचिन रानडे,पत्रकार गणेश दळवी,पत्रकार अविशांत कुमक, पत्रकार अविनाश कदम,पत्रकार अक्षय विधाते, पत्रकार संतोष नागरगोजे,पत्रकार शरद गर्जे,कैलास दरेकर,अशोक निकाळजे यांच्यासह ग्रामस्थ व पदाधिकारी आदींनी नवनिर्वाचित स्वीकृत नगरसेवकपदी अरुण निकाळजे,बाळासाहेब घोडके यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करत अभिनंदन केले.

# महाराणी ताराबाई विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी



**वडवणी । प्रतिनिधी**

**वडवणी शहरातील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये भारतातील पहिल्या शिक्षिका मुख्याध्यापिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त दि.३ जानेवारी २०२५ गुरुवार रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.**

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य राऊत डी.डी.तर प्रमुख अतिथी व वक्त्या म्हणून मराठी साहित्य विभागाच्या प्रमुख श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम तशाच हिंदी विषयाच्या अध्यापिका श्रीमती फलके मॅडम,उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर मान्यवर म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या शुभहस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला हार,गुलाल,फुले वाहून अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली सर्व मान्यवर व उपस्थिताचे विद्यार्थिनींनी स्वागत गीत गाऊन स्वागत केले. कु.ईश्वरी भालेराव,कु.राधिका निरडे तसाच सावित्रीबाई वेश्यामध्ये कु.कविता मुंडे,कु.पूनम आडे या विद्यार्थिनींनी आपले विचार व्यक्त केले व कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम यांनी जयंती निमित्त सुखोल असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करून जयंतीच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या आणि श्रीमती फलके मॅडम यांनी जयंतीच्या अनुषंगाने विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक विद्यालयाचे उपप्राचार्य मस्के सर यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.अंडील सर यांनी केले व उपस्थितांचे आभार पर्यवेक्षक धाईतिडक सर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## पान १ वरून...

### तुरीचा भाव पडल्याने

अजून तर तुरीची बाजारातील आवक वाढायची आहे. ज्या भागात तुरीची लागवड अधिक झाली त्याच भागातील तूर काढणी झाली. बाजारातील नव्या मालाची आवकही अगदी किंचित आहे. आवकेचा दबाव फेब्रुवारीपासून मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. त्या काळात तुरीच्या भावात आणखी नरमाई येईल का? अशी भीती शेतकऱ्यांमध्ये आहे. कारण सध्या आवक अगदी कमी असतानाही अनेक बाजारात भाव हमीभावाच्या खाली गेले आहेत. आवकेचा दबाव वाढल्यानंतर काही काळ का होईना मार्केट दाबावात येऊ शकते. शेतकऱ्यांनी लागवडीच्या काळात तुरीच्या भावातील तेजी पासून लागवड वाढवली. पण भाव कमी झाले. अनेक शेतकरी माल आल्यानंतर लगेच विकत असतात. जे शेतकरी थांबू शकत नाही त्यांना कमी भाव मिळू शकतो. आवकेचा दबाव कमी झाल्यानंतर तुरीच्या भावात वाढ होण्याची शक्यता आहे. मात्र जे शेतकरी थांबू शकत नाहीत त्यांनाही किमान हमीभाव मिळायला हवा. त्यासाठी सरकारने हमीभावाने तूर खरेदीसाठी वेळेत उद्दीष्ट जाहीर करून नोंदणी आणि खरेदी लवकर सुरु करण्याची मागणी शेतकरी करत आहेत.

----------

### दोन दिग्गज एकाच

यामुळे मंचावर दोघे एकमेकांच्या बाजूला बसले होते. विधानसभा निवडणुकीच्या आधी राष्ट्रवादीमध्ये उभी फूट पडली होती. निवडणूकी नंतर पहिल्यांदाच शरद पवार आणि आमदार छगन भुजबळ हे एकत्र आले. विशेष म्हणजे, छगन भुजबळांनी शरद पवारांना वेटिंगवर ठेवले होते. जवळपास १ तास उशीरा भुजबळ कार्यक्रम स्थळी पोहोचले. छगन भुजबळ परदेश दौऱ्यावरून परत आल्यानंतर ही भेट झाली आहे. कार्यक्रमानंतर माजी आमदार राम कांडगे यांच्या घरी दोन्ही नेत्यांची चर्चा झाली असल्याची माहिती समोर आली आहे. ही चर्चा नेमकी काय झाली याची माहिती अद्याप समोर आली नसून, मंत्रीपद न भेटल्याने नाराज असलेले भूजबळ उघडपणे बोलत आहेत. आपण नाराज असल्याचे ते वारंवार सांगत आहेत. आपण योग्य वेळी योग्य निर्णय घेणार असल्याचे ते म्हणाले असल्याने ती योग्य वेळी कोणती याबाबतही चर्चा होत आहे. भूजबळ यांना मंत्रीदन न मिळाल्याने ओबीसी नेते आणि समाजातही महायुती त्यातली त्यात अजित पवार यांच्याबाबत नाराजी पसरलेली आहे. या पार्श्वभुमीवर त्यांची शरद पवार यांची भेट आणि दोघांमध्ये झालेली चर्चा राजकीय वातावरण तापविणारी आहे. यावेळी छगन भुजबळ म्हणाले, मागे मी पवार साहेबांशी चर्चा केली. अनेकजण म्हणतात फुलेंना भारतरत्न दिले पाहिजे. मी साहेबांना विचारले महात्मा मोठे की भारतरत्न मोठे? मुळात भारतरत्न किती अन महात्मा किती आहेत? अहो, महात्मा गांधींनीही म्हटले ज्योतिबा फुले हे खरे महात्मा आहेत. जसे की छत्रपती शिवाजी महाराज हे एकमेव तसे महात्मा म्हटले की सगळे आले.

----------

### बीडचे पालकमंत्रिपद

आणखी एक मुद्दा चांगलाच गाजतोय तो म्हणजे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पालकमंत्रीपद. राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे खासदार बजरंग सोनवणे यांनी अजित पवारांनी बीडचे पालकमंत्री पद स्विकारावे अशी मागणी केली.

आमची पहिली पसंती ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत. जर मुख्यमंत्री झाले नाहीत तर अजितदादा झाले तरी चालेल अशी प्रतिक्रिया, भाजप आ. सुरेश धस यांनी दिली. दरम्यान, राष्ट्रवादीने बीडचे पालकमंत्रीपद गेले तर पालकमंत्री कोण करायचा हे राष्ट्रवादीने ठरवायचे आहे अशी प्रतिक्रीया भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. सरपंच हत्या प्रकरणानंतर बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीसोबतच बीडमधील राजकारणाचीही जोरदार चर्चा सुरू आहे. त्यातच धनंजय मुंडे यांनी पालकमंत्री करण्याला बीडमधील सर्वपक्षीय आमदारांचा विरोध केला आहे. त्यामुळे मुख्यमंत्री बीडच्या पालकमंत्रीपदाबाबत काय निर्णय घेतात ते पाहणे महत्वाचे ठरणार आहे, असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले आहेत. दरम्यान मुंडे बहिण-भावाला जिल्ह्यातून विरोध होऊ लागल्याने आता त्यांच्या ऐवजी पालकमंत्री पदी कोणाची वर्णी लावायची याबाबत फडणवीस, पवार, शिंदे यांच्यात एकमत झाल्याचे बोलले जात आहे. त्यानुसार अजित पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याची खात्रीलायक माहिती आहे.

------------

### मुंबईच्या डॉनलोकांपेक्षा

आहे. त्याची ताकद काय आहे ते मला माहित नाही. अशी दादागिरी कोणाची चालली नाही, डायरेक्ट पोलीस स्टेशनच्या बाहेर दारातच आला. मुंबईमधल्या मोठ्या गँगवारला आख्खी मुंबईची इंडस्ट्रीयल लॉबी घाबरायची. मुंबईच्या पोलिसांवर ते घाबरायचे, पोलीस त्यांना पकडून घेऊन यायचे. एवढी पोलिसांची दादागिरी होती. पण, वाल्मिक कराडची पोलिसांपेक्षा जास्त दादागिरी दिसून आली, असे आ. जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले आहे.

**खा. बजरंग सोनवण्यांच्या खुलास्यात तथ्य**

**वाल्मिक कराडवरुन जितेंद्र आव्हाडांचे थेट मंत्र्यांकडे बोट**

ठाणे-बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी खुलासा केला आहे. यात तथ्य असल्याची खात्री झाली आहे. अशी प्रतिक्रिया देत इलेक्शन फंडसाठी संतोष देशमुखांची हत्या झाल्याचा आरोप आ. जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.

----------

### सरपंच देशमुख हत्या

घेतली. यावेळी एसपींनी त्यांना काय सांगितले, याबाबत महत्त्वाची माहिती दिली. या प्रकरणात एका कंपनीकडे खंडणी मागितल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींनी २ कोटी रुपयांची खंडणी मागितली होती. त्यापैकी ५० लाख रुपये दिले गेले आहेत. दीड कोटी रुपये राहिले आहेत. दीड कोटी रुपये राहिले तर माणसं कोणी पाठवले. ते माणसं डायरेक्ट आकांनीच पाठवले. आकांनीच सांगितले होते. आकांनीच सांगितल्यावर हे लोक शुक्रवारी तिथे गेले होते. आता काय आहे, सीडीआर काढून कोण कुणाला काय बोलले हे सर्व बाहेर येत आहे. त्यामुळे मला नाही वाटत की, आका यातून बाहेर राहतील, असे सुरेश धस म्हणाले.

**टॉप सिक्रेट्सबद्दल धस काय म्हणाले?**

हे बघा मी एसपींना याबाबत बोललो. एसपी साहेब बोलले की साहेब, काही टॉप सिक्रेट्स आहेत. साहेब आम्ही तुम्हाला सांगू शकत नाहीत. ते खरं आहे आणि योग्य आहे ना. माहिती लिकेज झाली तर ती माहिती आरोपींपर्यंत जावून पोहोचू शकते. कारण त्यांना अनेक लोक प्रश्न विचारत असतील. विरोधी लोक, सत्ताधारी लोक विचारत असतील. एसपी सर्वांना सांगत गेले की, आम्ही असा तपास करत आहे, तर त्या गोष्टी बाहेर पडू शकतात. त्यांनी सांगितले की, या प्रकरणात टॉप सिक्रेट्स आहेत. आम्ही तुम्हाला सांगू शकणार नाही. मी म्हटले की, ओके. त्यांच्या टीम वेगवेगळ्या ठिकाणी गेलेल्या आहेत हे मला कळतंय, अशी माहिती सुरेश धस यांनी दिली.

**धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यायला हवा**

करूणा मुंडे यांच्या कारमध्ये पिस्तुल आकाच्या सांगण्यावरून तो पिस्तुल ठेवण्यात आलेला होता. तो ठेवणारा पोलिस कर्मचारी असल्याचे आ. धस यांनी सांगितले. तसेच नैतिकताच्या आधारावर धनंजय मुंडे यांनी या प्रकरणाची चौकशी होईपर्यंत किंवा चार्जशीट दाखल होईपर्यंत त्यांनी पदावर राहावे असे मला वाटत नाही, एकतर त्यांनी विना खात्याचे मंत्री राहावे किंवा अजित पवारांनी त्यांना काही दिवस मंत्री पदापासून बाजूला करावे असे मला वाटते, आणि ही सर्व जनतेची भावना आहे असेही पुढे सुरेश धस म्हणाले आहेत.

----------

### १० वर्षांत ४ कोटी गरीब कुटुंबाना दिली

प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान मोदींनी नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या आणि २०२५ हे वर्ष भारताच्या विकासासाठी संधींचे वर्ष असेल, असे म्हटले. उद्घाटन करण्यात आलेल्या प्रकल्पांमध्ये गरिबांसाठी घरे, शाळा आणि महाविद्यालयांशी संबंधित प्रकल्पांचा समावेश आहे. झोपडीच्या जागी पक्की घरे आणि भाड्याच्या घरांच्या जागी स्वतःची घरे, याचा अर्थ एक नवीन सुरुवात आहे, असे ते म्हणाले. ही घरे स्वाभिमान, आकांक्षा आणि स्वप्नांचे प्रतीक आहेत, असेही ते म्हणाले. यावेळी दिल्लीतील अशोक विहारमध्ये ईडब्ल्यूएस लाभधारकांसाठी बांधलेल्या १ हजार ६७५ फ्लॅटचे उद्घाटन आणि स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाची पायाभरणीही पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आली.

--------------

### लोकवर्गणीतून सरपंच देशमुख

आहे. या घटनेनंतर नागरिकांकडून लोकवर्गणी काढून देशमुख यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत केली जात आहे. माजलगावचे राष्ट्रवादीचे आ. प्रकाश सोळंके यांनी याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. माजलगाव मतदारसंघाच्या वतीने मृतक संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना एक मदत म्हणून ४४ लाख १३ हजार ४८८ रुपये जमा करून दिले आहेत. अजून तीन ते चार दिवसांमध्ये लोक निधी गोळा करत आहेत. ते झाले की आम्ही आणून देणार आहोत, अशी माहिती प्रकाश सोळंके यांनी दिली.

**तोपर्यंत धनंजय मुंडे यांना मंत्रीपदापासून दूर ठेवा**

आमच्या या प्रकरणात प्रामुख्याने दोन प्रमुख मागण्या आहेत. आरोपींना फाशीची शिक्षा होत नाही तोपर्यंत धनंजय मुंडे यांना मंत्रीपदाहून दूर करावे आणि या जिल्ह्याचा पालकमंत्री पद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःकडे घ्यावे. जेणेकरून या जिल्ह्यामध्ये गुंडगिरी, अवैध धंदे यांचे थैमान आहे, त्यांची मुळे जर उखाडून काढायची असतील तर तिथे कणखर माणूस पालकमंत्री झाला पाहिजे. ही आमची स्पष्ट भूमिका आहे, अशी भूमिका प्रकाश सोळंके यांनी मांडली.

-----------

### अन्न व नागरी पुरवठा मंत्री

पुरवठा निरीक्षक व अन्य रिक्त पदे भरून देण्याबाबतचा प्रस्ताव देखील स्वतंत्ररीत्या मागवण्याबाबत धनंजय मुंडे यांनी संबंधितांना या बैठकीत निर्देश दिले आहेत. एफसीआय कडे विविध करार काही दिले व अन्य असलेल्या मागण्यांच्या अनुषंगाने पुढील आठवड्यातील बैठकीमध्ये त्यावर निर्णय घेतला जाईल असेही धनंजय मुंडे यांनी यावेळी सांगितले. विविध जिल्ह्यांमध्ये ज्या ठिकाणी धान्याचे रॅक उतरवले जातात, त्या भागातील रस्ते व अन्य सुविधांच्याबाबतही स्वतंत्र आढावा घेऊन निर्णय घेण्यात येईल असेही धनंजय मुंडे म्हणाले आहेत. ई - पॉस मशीनवर डेटा उपलब्ध करून देणे, सर्वर डाऊन च्या समस्या यासह सर्वच्या सर्व तांत्रिक अडचणी तातडीने दूर करण्यासंदर्भात धनंजय मुंडे यांनी स्वतंत्र निर्देश दिले आहेत. या बैठकीस अन्न व नागरी पुरवठा विभागाचे सहसचिव, उपसचिव, शिधावाटप संचालनालयाचे नियंत्रक, पुरवठा विभागाचे सर्व उपयुक्त तसेच राज्यातील सर्व जिल्ह्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी व उपनियंत्रक आदी उपस्थित होते.

## अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई जयंती व बालिका दिन साजरा

वडवणी । प्रतिनिधी

दिनांक ०३ जानेवारी२०२५ वार शुक्रवार रोजी अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चिंचाळा ता. वडवणी जि. बीड येथील विद्यालयात ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख उपस्थित मान्यवर व विद्यालयाचे मुख्याध्यापक/ प्राचार्य श्री सावंत बी. आर. आधी सर्वांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच कार्यक्रमाचे प्रस्ताविक आवारे सर यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्र संचालन सावंत मॅडम यांनी केले.त्याच बरोबर या कार्यक्रमासाठी विद्यालयातील वर्ग ५ ते १२ वी मधील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्या चि.आवड निखील,कु.प्रिया शेंडगे ,कु.तनुश्री कराड , कु .साक्षी कुचेकर या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट पणे आपले मनोगत व्यक्त केले. त्याच बरोबर सर्व शिक्षक वृंद यांनीही आपले मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले.विद्यालयातील मुख्याध्यापक/प्राचार्य सर यांनी आपल्या मनोगतातून स्त्री शिक्षणाचे महत्त्व, आजच्या आधुनिक तंत्रज्ञान युगातील महिला या बाबत मार्गदर्शन करताना भारतातील पहिल्या शिक्षिका, मुख्याध्यापिका,

स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या,विद्येची जननी व समस्त स्त्रियांना उजेडाची वाट दाखवणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ज्यांनी स्त्रियांन बद्दल ''चुल आणि मुल'' ही भावना मोडीत काढुन. स्त्री शिक्षणाचा पाया रोवला. आणि स्त्रियांना सन्मानाचे जीवन मिळवुन दिलं.

# विद्यार्थ्यांनी असाध्य गोष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करायला हवी- डॉ .दराडे

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

कोणतीही गोष्ट साध्य किंवा असाध्य नसते. त्यामुळे कुठलीही असाध्य गोष्ट साध्य करण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची गरज असल्याचे मत स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय तथा वैद्यकीय महाविद्यालयातील नेत्र विभाग प्रमुख डॉ ज्ञानोबा दराडे यांनी व्यक्त केले. ते प्रियदर्शनी क्रीडा , सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्या वतीने आयोजित बाल झुंबड- २०२५ च्या शुभारंभ प्रसंगी बोलत होते. अंबाजोगाई तालुक्यातील सर्व शालेय विद्यार्थ्यांसाठी बालझुंबड या उपक्रमाचे हे २५ वे म्हणजेच रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. प्रियदर्शनी क्रीडा मंडळाचे संस्थापक राजकिशोर मोदी यांच्या संकल्पनेतून अंबाजोगाई तालुक्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी बालझुंबड हा उपक्रम सुरू करण्यात आला होता. कोव्हिडंचा काळ सोडला तर हा उपक्रम अखंडपणे चालू आहे. २०२५ च्या बालझुंबड उपक्रमाच्या उद्घाटनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉ ज्ञानोबा दराडे , उद्घाटन दैनिक वार्ता समूहाचे संपादक परमेश्वर गित्ते, वसंतराव काळे विद्यालयाचे मुख्याध्यापक केदार सर, प्राचार्य रेंजू आरचंद्रन , प्राचार्य तरके सर, मुख्यध्यापक आनंद टाकळकर, आप्पा चव्हाण, विनायक मुंजे, विजय रापतवार, मुख्याध्यापिका श्रीमती अंजली जोशी तसेच परीक्षक म्हणून श्रीमती ज्ञानेश्वरी पवार, शीतल फुंदे, संभाजी गित्ते, कु ज्योती मुरकुटे, यांच्यासोबतच इक्बाल विद्यालयाचे अब्दुल मुजाहेद व पुसरेकर सर हे उपस्थित होते.

यावर्षीच्या बालझुंबड उपक्रमाच्या रौप्यमहोत्सवी वर्षाची सुरुवात सावित्रीबाई फुले व साने गुरुजींच्या प्रतिमांचे पूजन करून तसेच मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक महाविद्यालयाचे प्राचार्य विनायक मुंजे यांनी केले.बाल झुंबड हे अंबाजोगाई तालुक्यातील सर्व शाळा व





शाळेतील विद्यार्थ्यांचे एकत्रित स्नेह संमेलन असल्याचे मुंजे यांनी सांगितले. मागील चोवीस वर्षापूर्वी प्रियदर्शनी क्रीडा मंडळाचे संस्थापक राजकिशोर मोदी, सांस्कृतिक विभाग प्रमुख दिनकर जोशी यांनी बाल झुंबड हा उपक्रम सुरू केला आणि त्या उपक्रमाचे आज रौप्यमहोत्सवी वर्ष असून या उपक्रमाची परंपरा मंडळाचे कार्यकारी संचालक संकेत राजकिशोर मोदी हे पुढे चालवीत आहेत. या उपक्रमात दरवर्षी नाविन्यपूर्ण स्पर्धा आणण्याचा प्रयत्न मंडळाच्या वतीने करण्यात येत असल्याचे प्राचार्य विनायक मुंजे यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले. याप्रसंगी वसंतराव काळे विद्यालयाचे प्राचार्य केदार सरांनी बालझुंबड या उपक्रमाला आपल्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात उद्घाटक तथा प्रमुख पाहुणे स्वा रा ती चे नेत्र विभाग प्रमुख डॉ ज्ञानोबा दराडे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शालेय विद्यार्थी व वातावरण पाहून आपणास शालेय जीवन आठवल्याचे डॉ दराडे यांनी नमूद केले. बाल - झुंबड उपक्रमातील विविध स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडत असून याचा लाभ घेण्याचे अवाहन देखील डॉ.दराडे यांनी केले आहे. राजकिशोर मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली कोवळ्या रोपट्याला आकार देण्याचे काम बाल झुंबड हा उपक्रम करत असून या उपक्रमाचे अभिनंदन करत डॉ दराडे यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत. कोणतीही असाध्य गोष्ट साध्य करण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याचे आवाहन डॉ दराडे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना केले. यासाठी त्यांनी संत तुकाराम महाराजांच्या ओव्याच्या आधार घेतला. विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातच आपले ध्येय निर्धारित करून ते गाठण्यासाठी आपले संपूर्ण लक्ष केंद्रित केले पाहिजे असाही मौलिक सल्ला डॉ ज्ञानोबा दराडे यांनी विद्यार्थ्यांना दिला. बालझुंबड २०२५ च्या उद्घाटन समारंभाचा अध्यक्षीय समारोप दैनिक वार्ताचे संपादक परमेश्वर गित्ते यांनी केला. सर्वप्रथम त्यांनी बालझुंबड या उपक्रमाला २५ वर्ष पूर्ण होत असल्याबद्दल प्रियदर्शनी क्रीडा मंडळाचे संस्थापक राजकिशोर मोदी, दिनकर जोशी, संकेत मोदी व त्यांच्या संपूर्ण सहकाऱ्यांचे अभिनंदन केले. या उपक्रमात सहभागी झाल्यानंतर विद्यार्थी ताजेतवाने झाल्याचा अनुभव करतात यावरून बाल झुंबड हा उपक्रम हा विद्यार्थ्यांची एक सांस्कृतिक चळवळ झाल्याचे परमेश्वर गित्ते यांनी स्पष्ट केले. या उपक्रमातुन आतापर्यंत अनेक विद्यार्थी मोठ्या उच्च पदापर्यंत पोचले असून ,अनेकजण उत्कृष्ट खेळाडू त्याचबरोबर विविध क्षेत्रात आपले नाव झळकावत असल्याचे देखील गित्ते यांनी अभिमानाने सांगितले. यातून राजकिशोर मोदी यांनी अंबाजोगाई शहरात शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्र रुजवण्यासाठी चे व्रत लिलया पेलले असल्याचे सांगत बालझुंबड हा उपक्रम यापुढेही असाच अखंडितपणे सुरू राहील अशी अपेक्षा व्यक्त करत या उपक्रमाच्या संपूर्ण टीम चे अभिनंदन केले आहे.आजच्या या उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्र संचलन बाल झुंबडचे समन्वयक राजेश कांबळे तर उपस्थित सर्वांचे आभार प्रा आनंद कांबळे यांनी व्यक्त केले. आजच्या पीपीटी स्पर्धेत जवळपास ८० शालेय टीमच्या माध्यमातून आपला सहभाग नोंदवला. याप्रसंगी विविध शाळेतील अनेक विद्यार्थी व त्यांचे शिक्षक मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते.





**माजलगाव:- शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त त्यांच्या पावन स्मृतीस अभिवादन करताना माजलगाव मतदार संघाचे छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन मोहनराव जगताप,शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, भाजपा तालुकाध्यक्ष अरुणराव राऊत, माजी जिल्हा परिषद सदस्य शिवप्रसाद खेत्री,भाजपा भटक्या विमुक्त आघाडीचे प्रदेश सचिव ज्ञानेश्वर सरवदे,ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विलास नेमाने, शामसुंदर पंचाळ यांची उपस्थिती होती**

## स्नेहसंमेलनातूनच संघटणांची प्रेरणा,सहकार्य, एकात्मता, इत्यादी गुणांचा विकास -प्रशांत भानप

माजलगाव । प्रतिनिधी

येथील श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयात दि ०३ जानेवारी शुक्रवार रोजी सावित्रीबाई फुले जयंती व सामूहिक नृत्यस्पर्धा संपन्न.कार्यक्रमाची सुरुवात पुण्यश्लोक अझहिल्याबाई होळकर व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. व्यासपीठावर प्रशांत भानप,मुख्याध्यापक संतोष लिंबकर, विभाग प्रमुख रवींद्र खोडवे,पर्यवेक्षक सदाशिव ढगे,अभ्यासपूरक मंडळ प्रमुख अपर्णा मुळे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी प्रशांत भानप (सि.मा.वि.अध्यक्ष)यानी सर्व महिला शिक्षिकांच्या कार्याचे गुलाब पुष्प देऊन त्यांचा सन्मान केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रवींद्र खोडवे यांनी केले,प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांना शिरीश देशमुख यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या आदर्श कर्याची विद्यार्थ्यांना ओळख करून दिली. अध्यक्षीय समारोप करताना प्रशांत भानप म्हणाले,तुमचा उत्साह,उमेद,तयारी पाहून असे वाटते की,निश्चितच तुमचे सादरीकरण उत्कृष्ट होणार आहे.परंतु स्पर्धेत नंबर येईल न येईल आपण सर्वांनी नृत्य कलेचा आनंद घ्यावा. अशा स्नेहसंमेलनातूनच

संघटणेची प्रेरणा,सहकार्य, एकात्मता,इत्यादी गुणांचा विकास होईल.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्रीमती आशालता करपुडे, श्रीमती वैशाली फुलसे यांनी केले. प्रशांत होके,विशाल ठोसर, श्रीमती स्वप्ना देशपांडे यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. स्पर्धा प्रमुख चैतन्य आहेर,नितिन सोनवणे,राहुल नाईक यांनी स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी विशेष प्रयत्न केले.त्यांना क्रीडा शिक्षक पंडित मेंडके व सर्वच इयत्ता ८वी, ९वी,च्या वर्गशिक्षकांचे सहकार्य लाभले. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या कलात्मक गुणांचे उत्कृष्ट सादरीकरण केले.गोंधळ गीते,देशभक्ती गीते,सर्व शिक्षक, शिक्षिका,विद्यार्थी यांनी मनस्वी आनंद घेतला.

# 'स्वच्छ माझे अंगण उपक्रम' राबविणाऱ्या कुटुंबाचा होणार सन्मान

जालना । प्रतिनिधी

स्वच्छतेची सवय अंगीकृत करण्यासाठी लोक चळवळ उभी करण्याच्या उद्देशाने राज्यात स्वच्छ माझे अंगण अभियानाचे आयोजन केले असून, यामध्ये जिल्ह्यातील सर्व ग्राम पंचायतीने सहभागी होवून कुटुंब स्तरावर वैयक्तिक सांडपाणी व्यवस्थापन ची प्रभावी उपाय योजना राबवावी ,या कालावधीत उत्कृष्ट काम करणाऱ्या कुटुंबाचा २६ जानेवारी रोजी सन्मान केला जाणार असून जास्तीत जास्त ग्रामपंचायतीने या अभियानात मोठ्या प्रमाणावर सहभागी असे आवाहन जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी लिंबाजी बारगिरे यांनी प्रशिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

जिल्ह्यातील एकूण ९६१ गावात वैयक्तिक शौचालय,सांडपाणी व्यवस्थापन करिता शोषखड्डा अथवा घरगुती खतखड्डा व कुटुंब स्तरावर निळ्या व हिरव्या कचरा कुंड्या चा प्रभावी वापर करणाऱ्या कुटुंबाचा दिनांक २६ जानेवारी रोजी प्रत्येक ग्राम पंचायत स्तरावर सत्कार करण्यात येणार आहे.

स्वच्छ भारत मिशन टप्पा क्र २ अंतर्गत जिल्ह्यातील सर्व ग्राम पंचायती मध्ये स्वच्छ माझे अंगण हे अभियान दि १ ते २० जानेवारी २०२५ दरम्यान राबविण्यात येणार आहे. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व पंचायत विभाग यांच्या वतीने





जिल्ह्यात सादरील अभियान राबविण्यात येणार आहे. वैयक्तिक शौचालय, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन उपक्रमात समविष्ट असलेल्या सर्व गावात हे अभियान राबविले जाणार आहे.या कालावधीत स्वच्छतेच्या बाबीच्या सवयी आत्मसात करण्यासाठी व इतर कुटुंबाला प्रोत्साहन मिळावे या करिता ज्या कुटुंबाकडे वैयक्तिक शौचालय आहे,सांडपाणी व्यस्थापन साठी शोषखड्डा किंवा परसबाग किंवा पाझर खड्डा आहे,स्वच्छतेचे दोन रंग अंतर्गत हिरव्या व निळ्या कचरा कुंड्या द्वारे कचरा संकलन केला जातो. या सर्व घटकांचा नियमितपणे वापर करतात अशा कुटुंबाची निवड करून दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी प्रजासत्ताक दिनी ग्राम पंचायत स्तरावर श्रीफळ, पुष्प व प्रशस्तीपत्र देवून सन्मान करण्यात येणार आहे.

स्वच्छ माझे अंगण अभियान राबविण्यासाठी ग्राम पंचायत स्तरावर अभियानाची माहिती व सूचना सर्व ग्रामस्थांना देणे साठी दवंडी देणे , ग्राम पंचायत , शाळा , अंगणवाडी , तलाठी सज्जा, प्राथमिक आरोग्य केंद्र , उपकेंद्र , सेवा सहकारी सोसायटी कार्यालय , आदि ठिकाणी सूचना फलकावर सूचना लावणे.

सदरील कालावधीत पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या वतीने गृहभेटी देवून सदरील बाबीची तपासणी करणे व या सर्व बाबीचा वापर होत असलेल्या बाबत खात्री करणे .अशा कुटुंबाना २५ जानेवारी रोजी पत्र देवून २६ जानेवारी रोजी उपस्थित राहणे बाबत कळविणे , व सर्व ग्रामस्था समक्ष कुटुंबाचा सन्मान करणे. घरगुती खतखड्डा /पाझर खड्डा , वैयक्तिकशौचालय , वैयक्तिक कचरा कुंड्या य बाबीवर हे अभियान राबविले जाणार असल्याने ग्राम पंचायत स्तरावर या बाबींची तयारी करून , व जास्तीतजास्त कुटुंबाला सहभागी करून घ्यावे असे आवाहन जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी लिंबाजी बारगिरे यांनी केले आहे.

अभियान कालावधी १ ते २० जानेवारी ,पडताळणी कालावधी २१ ते २४ जानेवारी , पात्र कुटुंबाला लेखी पत्र देणे २५ जानेवारी व गाव पातळीवर सम्मान दि २६ जानेवारी. *निकष*

घरगुती खतखड्डा /पाझर खड्डा असणे,वैयक्तिक शोषखड्डा /परसबाग असणे ,वैयक्तिक शौचालय असणे ,घरगुती कचरा कुंडी असणे.





## दिंद्रुड येथे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांना विविध ठिकाणी अभिवादन

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील ग्रामपंचायत कार्यालय, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा (कन्या-मुलांची), माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जिल्हा परिषद प्रा. मुलांची शाळा, लोकशक्ती विद्यालय, इंदिरा गांधी कन्या विद्यालय, शिवाजीनगर वस्तीशाळा, संत सावता महाराज मंदिर, विविध खासगी व शासकीय संस्था तसेच पंचक्रोशीतील ठिकठिकाणी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन केले.

दिंद्रुड परिसरात विविध सामाजिक उपक्रम राबवून ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. तर शाळांमध्ये मुलींनी सावित्रीबाईंचा पेहराव परिधान करत त्यांच्या थोर विचारांना उजाळा देऊन स्त्री शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगितले. तसेच एकही मुलगी शिक्षणा वाचून वंचित राहता कामा नये, असे भाषणातून सांगत, शिक्षणाचे व सावित्रीबाईंच्या विचारांचे महत्त्व समाजापुढे मांडले.

## डॉ.राजेश इंगोले यांना आयएमएचा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान; सर्वस्तरांतून अभिनंदन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

इंडीयन मेडीकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक समिती अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांना इंडीयन मेडीकल असोसिएशनच्या नॅशनल प्रेसिडेंटस एॅप्रेसिएशन अवॉर्ड फॉर बेस्ट कल्चरल ऍक्टिव्हिटी या अत्यंत सन्मानाचा राष्ट्रीय पुरस्कार नुकताच प्रदान केला गेला आहे. इंडीयन मेडीकल असोसिएशन महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष म्हणून केलेल्या कार्याबद्दल व समिती तर्फे महाराष्ट्रातील डॉक्टर्ससाठी आयोजित करण्यात आलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमाची पावती त्यांना राष्ट्रीय स्तरावर मिळाली आहे. महाराष्ट्रात आजपर्यंत हा पुरस्कार फक्त डॉ.राजेश इंगोले यांना मिळाला आहे. त्याबद्दल डॉ.इंगोले यांचे सर्वस्तरांतून अभिनंदन होत आहे.

यापूर्वीही डॉ.इंगोले यांना इंडीयन मेडीकल असोसिएशन महाराष्ट्र राज्याच्या वतीने दिला जाणारा व अत्यंत प्रतिष्ठेचा असा राज्यस्तरीय डॉ.सुरेश नाडकर्णी व आय.एम.ए.एम.एस प्रेसिडेंट एॅप्रेसिएशन अवॉर्डस फॉर बेस्ट कल्चरल ऍक्टिव्हिटी या पुरस्काराने गौरवण्यात आले होते. तसेच अंबाजोगाई शाखेचे अध्यक्षपद भूषविताना त्यांना आय.एम.एचे दोनदा



बेस्ट प्रेसिडेंट व दोनदा बेस्ट ब्रँच हे राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते.

सांस्कृतिक समितीच्या महाराष्ट्र राज्याचे अध्यक्षपद भूषवितांना त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील डॉक्टर्ससाठी विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन केले होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली त्यांनी पुणे येथे साहित्यिक डॉक्टर्ससाठी पहिल्यांदाच शब्दशारदा साहित्य संमेलन भरवले होते. तसेच त्यांनी गायन स्पर्धा, नृत्य स्पर्धा, रिल्स स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, नाट्य स्पर्धा, फोटोग्राफी स्पर्धा अशा विविध प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करून महाराष्ट्रातील सर्व डॉक्टर्ससाठी एक सशक्त व्यासपीठ निर्माण करून वैद्यकीय क्षेत्रात सांस्कृतिक चळवळ गतिमान केली. त्यांच्या या उल्लेखनिय कामगिरीबद्दल त्यांना इंडीयन मेडिकल असोसिएशन राष्ट्रीय कार्यकारणीने हा प्रतिष्ठेचा पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. त्यांच्या या अभिनमानस्पद कामगिरीबद्दल त्यांचे सर्वस्तरांतून स्वागत व अभिनंदन होत आहे. या पुरस्कारांबद्दल आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले की, इंडीयन मेडीकल असोसिएशनचा अत्यंत प्रतिष्ठेचा व ज्या पुरस्काराचे स्वप्नं संघटनेचा प्रत्येक डॉक्टर पाहतो हा पुरस्कार मला मिळाला हे माझ्यासाठी स्वप्नवत आहे. संघटनेने माझ्या सांस्कृतिक कार्याची दखल घेऊन हा राष्ट्रीय पुरस्कार मला दिला. याचे श्रेय मला नेहमीच तोलामोलाची साथ व सहकार्य देणारे डॉ.सिद्धेश्वर बिराजदार, डॉ.विजय लाड, डॉ.बळीराम मुंडे, डॉ.योगेश मुळे,डॉ अरुणा केंद्रे, डॉ नितीन पोतदार, डॉ नितीन चाटे, डॉ स्नेहल होळंबे, डॉ ऐश्वर्या चव्हाण, डॉ.नवनाथ घुगे, डॉ.श्रीनिवास रेड्डी यांच्यासह जेष्ठ मार्गदर्शक डॉ.सुधीर देशमुख, डॉ.दिलीप खेडगीकर, डॉ.एन.पी.देशपांडे, डॉ.उत्तम निसाले, डॉ.शैलेश वैद्य, यांच्यासह सर्व आयएमएच्या जेष्ठ आणि श्रेष्ठ साथीदारांचे आहे. हा पुरस्कार मी त्यांना समर्पित करतो. सांस्कृतिक समितीचे अध्यक्षपद भूषविताना या कार्यात मला साथ देणाऱ्या सांस्कृतीक समिती सदस्य डॉ.गितांजली शर्मा, डॉ.तुकाराम मुंढे, डॉ.मोहिनी गानू, डॉ.वृंदा कुलकर्णी, डॉ.राजश्री सावंत, डॉ.माया भालेराव, डॉ.प्रज्ञा किनगावकर, डॉ.प्रफुल्ल जटाळे, डॉ.राजन जोशी, डॉ.वैष्णवी पाटील, डॉ.पल्लवी दोडके, डॉ.सारंग दराडे यांना हा पुरस्कार मी समर्पित करतो असे भावपूर्ण उद्गार त्यांनी काढले. हे यश माझ्या विविध संकल्पनांना मूर्त स्वरूप देणाऱ्या या सर्व साथीदारांचे आहेत त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. असेच कार्य पुढे करीत राहील अशी आपणांस ग्वाही देतो. असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी केले. पुरस्कार वितरणाचा शानदार भव्य कार्यक्रम हैदराबाद येथे शताब्दी संमेलन केंद्र, हैद्राबाद येथे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. टी असोकन, राष्ट्रीय सचिव डॉ.अनिलकुमार जे.नायक तसेच नूतन अध्यक्ष जगप्रसिद्ध एआई हॉस्पिटलचे संचालक डॉ दिलीप भानुशाली यांच्या हस्ते दिनांक २७ डिसेंबर २०२४ रोजी प्रदान करण्यात आला.


## पान ६ वरुन...


### आपले ध्येय उच्च ठेवा आणि ते

फुले यांचे जीवन आणि कार्य आजही आम्हाला प्रेरित करतं, त्यांचं योगदान अत्यंत महत्त्वाचं आहे. त्यांची वैचारिक जडणघडण कशी झाली, हे समजून घ्यायला हवे असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे यांनी यावेळी बोलतांना म्हणाले की, क्रांतीज्योती सावित्रीमाई व क्रांतीबा ज्योतिबा फुले यांनी अखंड परिश्रम घेऊन शिक्षणाची गंगा ग्रामीण भागापर्यंत आणि तळागळातील बहुजन समाजापर्यंत आणली त्या सावित्रीमाई, जोतीराव फुलेंचे जीवन आणि कार्य सर्वांना माहित व्हावे हा उद्देश असल्याचे मत व्यक्त केले.अभिवादन सभा संपताच नालंदा फाऊंडेशन बीडच्या वतीने उपस्थित सर्व विद्यार्थी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते व रॅलीत सहभागी जनसमुदाय यांना अल्पोहार देण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अंकुश कोरडे यांनी केले, तर आभार मनोगत प्रा. राम गायकवाड यांनी व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमास ३२ शाळा, महाविद्यालयातील १००० पेक्षा अधिक विद्यार्थी व शिक्षकांसह प्रियदर्शनी धम्मसंस्कार संस्थेचे पदाधिकारी, सर्वसामाजिक संघटनांचे पदाधिकारी, तुलसी शैक्षणिक समूहातील सर्व कर्मचारी यांच्यासह बीडवासीय बहुसंख्येने उपस्थित होते.

### विद्यार्थी मित्रांनो वेळेचे

यशस्वी होण्यासाठी प्रत्येकांनी आपल्या जीवनातील वेळ न दवडता वेळेचे भान ठेवायला हवेत.प्रत्येकाला जीवनात यशस्वी होण्यासाठी एक वेळ सुवर्ण संधी मिळत असते.मात्र त्या संधीचे प्रत्येकाला सोनं करता आले पाहिजे. याचबरोबर शिस्त,संस्कार अंगी बाळगणे महत्वाचे आहे.यातूनच आपल्याला निश्चितपणे यशाचे शिखर गाठता येते. मात्र यासाठी मनात जिद्द, चिकाटी व परिश्रम करण्याची तयारी ठेवायला हवी. असे आवाहन हि बाबासाहेब गोंटे यांनी याप्रसंगी बोलताना केले. कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जिव्हाळा सावित्रीमाईच्या

म्हणुन येथील जयंती श्रेष्ठ वाटते.या घरातील वृद्धांची सेवा करणे, निराधार ठरलेल्या या मंडळींना जात,धर्माच्या पलीकडे जाऊन माणुस म्हणून त्यांना जपणे ही बाब जिव्हाळा येथे घडते.हेच खरे सावित्रीमाई फुले यांच्या विचारांचे घर आहे.

या निराधारांना आधार देण्याचे काम सावित्रीमाई ची लेक म्हणून छायाताई करत आहेत.त्यांचा आज सावित्रीमाई फुले जयंतीदिनी सन्मान करून त्यांचे कौतुक केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन वैद्य सर प्रास्ताविक राजु वंजारे व आभार प्रदर्शन नितीन धांडे यांनी मानले.

### क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले

शेकडो बालकांची तपासणी करून औषधोपचार करण्यात आला. तसेच मुलांना खाऊ वाटुन सावित्रीमाईंना अभिवादन करण्यात आले. या स्तुत्य उपक्रमा बद्दल डॉ. सानप भगीनींचे विधातेताईंनी आभार मानले. या कार्यक्रमाला आदर्श शिक्षिका आशाताई गुजर, भारतीताई सोनवणे, रुक्मिणीताई धसे, र्निमलाताई दहिफळे , मीनाताई परदेशी, सुनिताताई विद्यागर यांची विशेष उपस्थिती लाभली होती.

### रोटरी क्लबने २० मुलींना

बँकेच्या व्यवस्थापक शीतल बनाळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्रा.रोहिणी पाठक,मंजुषा जोशी, प्रकल्प समन्वयक प्रा.डॉ.शैलजा बरूरे , प्रशिक्षक प्रा. संतोष मोहिते, रोटरीचे अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी, बालाजी घाडगे,रुपेश रामावत,जतिन कर्णावट यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना शीतल बनाळे म्हणाल्या की मुलींना बँकिंग व विमा क्षेत्रात मोठी संधी उपलब्ध आहे. त्या दृष्टीने त्यांनी अभ्यासक्रम निवडावेत व प्रशिक्षण घ्यावे. रोटरी क्लब ने मिळवून दिलेल्या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले. या वेळी प्रा.रोहिणी पाठक यांनी मुलींना बचत व आर्थिक सुरक्षितता या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. संतोष मोहिते यांनी केले. संचलन मंजुषा जोशी यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा.डॉ. शैलजा बरूरे यांनी मानले.

### आजच्या धावपळीच्या

पाहिजे असेही त्यांनी आवाहन केले.

यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रीती पोहेकर यांनी आपल्या मनोगतात बोलताना म्हणाल्या की, सावित्रीबाई फुले यांचे कार्य महान आहे. एक पहिली स्त्री शिक्षिका म्हणून त्या काळात त्यांनी खूप संघर्ष भोगला. शैक्षणिक कार्यात सावित्रीबाई फुले यांचे मोठे योगदान आहे. सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या कार्याचे स्मरण व्हावे आणि विद्यार्थ्यांनी ग्रंथाचे वाचन करावे असेही त्यांनी सांगितले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.कल्पनाताई चौसाळकर यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, आपले आरोग्य आपल्या हातात आहे तेव्हा आरोग्याच्या बाबतीत काळजी घेणे आवश्यक आहे. कोविड काळानंतर आपण बाहेर आलो तेव्हा आरोग्याच्या विषयी आपण नियमित तपासणी करून जागरूक राहिले पाहिजे तसेच सावित्रीबाई फुले यांच्या विषयी बोलताना त्यांनी सांगितले की, सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा आदर्श आपण घेतला पाहिजे. त्यांच्या चरित्र ग्रंथाचे वाचन केले पाहिजे असेही त्यांनी आवाहन केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. रोहिणी अंकुश ,सूत्रसंचालन डॉ. तृप्ती पाडेकर यांनी केले तर आभार डॉ. मृणाल गोरे यांनी मानले . डॉ.गंगा शेळके यांनी कल्याण मंत्र म्हणून कार्यक्रमाची सांगता केली .यावेळी प्रा.कालिदास चिटणीस यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर आधारित गीत सादर केले.

### गुरुकुल इंग्लिश स्कूल

सावित्रीबाईंनी पुढाकार घेवून भिडेंच्या वाड्यामध्ये शाळा सुरु केली आणि स्त्रियांना न्याय देण्याचा प्रयत्न केला म्हणूनच आज प्रत्यक क्षेत्रामध्ये स्त्रिया आपल्याला पाहायला मिळत आहेत. तसेच शिक्षिका सौ.पवार सुनंदा यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.सोनमाळी आकांक्षा हिने तर आभार प्रदर्शन बोराडे आदिनाथ यांनी व्यक्त केले.

### माजलगाव येथून जागतिक

वरील नेते मंडळी यांनी या धम्म परिषद सहभागी होण्याचा निर्णय घेतल्यामुळे त्यांना येथील बौद्ध बांधवांनी भीम नगर येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर सामूहिक बुद्ध वंदना घेऊन त्यांना या पवित्र ठिकाणी जाण्यासाठी निरोप दिला.यावेळी बहुसंख्य बौद्ध बांधव उपस्थित होते.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
शनिवार दि.४ जानेवारी २०२५


# मराठवाड्यात पाणीसाठा ८० टक्क्यांवर ; पंधरा प्रकल्पातील पाणीसाठा जोत्याखाली

छत्रपती संभाजीनगर : मराठवाड्यातील ७५१ लघु व ७५ मध्यम प्रकल्पांपैकी १५ प्रकल्पातील पाणीसाठा जोत्याखाली गेला आहे. दुसरीकडे सर्व प्रकल्पांमधील उपयुक्त पाणीसाठा ८०.७२ टक्के राहिला आहे.मराठवाड्यातील ११ मोठ्या प्रकल्पांपैकी बीड परभणी व हिंगोली जिल्ह्यातील प्रतिकृती एका प्रकल्पांमध्ये ५० ते ७५ टक्के तर छत्रपती संभाजीनगर, बीड व परभणीतील प्रत्येक एक, धाराशिवमधील २ व नांदेडमधील ३ मिळून ८ प्रकल्पात ७५ टक्क्यांपेक्षा जास्त पाणीसाठा शिल्लक आहे. मध्यम ७५ प्रकल्पांपैकी जालन्यातील एका प्रकल्पातील पाणीसाठा जोत्याखाली आहे.

छत्रपती संभाजीनगरमधील २ मध्यम प्रकल्पात २५ टक्के पेक्षा कमी, धाराशिव व छत्रपती संभाजीनगरमधील प्रत्येकी ३ तर जालना,बीड,लातूरमधील प्रत्येकी एका प्रकल्पात २५ ते ५० टक्के, तर ११ प्रकल्पात ५० ते ७५ टक्के, छत्रपती संभाजीनगर व धाराशिवमधील प्रत्येकी १०, बीडमधील १२ ,नांदेडमधील ९, परभणीतील २,लातूरमधील ५ व जालन्यातील ४ मिळून ५२ प्रकल्पात ७५ टक्केपेक्षा जास्त पाणीसाठा आहे. ७५१ लघु प्रकल्पांपैकी १४ प्रकल्पातील पाणीसाठा जोत्याखाली आहे. दुसरीकडे ६७ प्रकल्पात २५ टक्केपेक्षा कमी, ९० प्रकल्पात २५ ते ५० टक्के,९ प्रकल्पात ५० ते ७५ टक्के आणि ३८७ लघु प्रकल्पात ७५ टक्क्यांपेक्षा जास्त पाणीसाठा आहे. मराठवाड्यातील एकूण ८७९




## मोठ्या प्रकल्पांची पाणीसाठा स्थिती

मराठवाड्यातील ११ मोठ्या प्रकल्पांपैकी जायकवाडी प्रकल्पात ९० टक्के, येलदरीमध्ये ९४ टक्के, सिद्धेश्वरमध्ये ७३ टक्के, माजलगावमध्ये ७१ टक्के, मांजरामध्ये ९२ टक्के, उर्ध्व पैनगंगामध्ये ९१ टक्के, निम्न तेरणामध्ये ९७ टक्के, निम्न मनारमध्ये ८५ टक्के, विष्णुपुरीत ८४ टक्के, निम्न दुधनामध्ये ६६ टक्के, तर सीना कोळेगाव प्रकल्पात ८८ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे.

मोठ्या, मध्यम, लघु, प्रकल्पांसह गोदावरी, तेरणा, मांजरा, रेणा नदीवरील बंधारामध्ये ८०.७२ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असल्याची माहिती जलसंपदा विभागाच्यावतीने देण्यात आली. छत्रपती संभाजी नगर व जालना जिल्ह्यातील लघू प्रकल्पांमधील उपयुक्त पाण्यासाठी सर्वात कमी आहे. त्या पाठोपाठ धाराशिव,हिंगोली, परभणी, बीड, नांदेड व लातूरचा लघु प्रकल्पातील शिल्लक पाणीसाठा बाबत अनुक्रमे क्रमांक लागतो.

# ब्रोकली लागवडीतून मिळता भरघोस नफा



ब्रोकली कर्करोगापासून हृदयाच्या आरोग्यापर्यंत सर्वांसाठी चांगली मानली जाते. बाजारात याला खूप मागणी आहे. अशा परिस्थितीत शेतकरी ते पिकवून मोठा नफा मिळवू शकतात. महाराष्ट्रात देखील याचे पीक घेतले जात आहे. शेतकरी ब्रोकोलीची लागवड करून नफा कमवू शकतात.

हरियाणा, नोएडा अशा ठिकाणी याचे सर्वाधीक उत्पादन घेतले जाते. ब्रोकोली पीक सामान्य फुलकोबी पिकापेक्षा अधिक फायदे देत आहे. सामान्य कोबीमध्ये एका झाडावर एकच फूल दिसते. तर ब्रोकोलीमध्ये एका झाडावर एक फूल कापल्यानंतर त्यावर सहा ते आठ फुले येतात. केवळ चांगल्या उत्पादनाचे फायदे आहेत. त्याचबरोबर कृषी तज्ज्ञही ब्रोकोली पिकाला शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याचे चांगले साधन मानत आहेत. बाजारात त्याला चांगली मागणी आहे. मोठ्या शहरातील हॉटेल्स आणि रेस्टॉरंटमध्ये याला चांगली मागणी आहे. ब्रोकोली पीक केवळ ६० ते ६५ दिवसांत काढणीसाठी पूर्णपणे तयार होते. पीक चांगले असल्यास एक हेक्टरमध्ये सुमारे १५ टन उत्पादन मिळते. हे तीन रंगांचे आहे: पांढरा, हिरवा आणि जांभळा. पण हिरव्या ब्रोकोलीला सर्वाधिक मागणी आहे. एक हेक्टरमध्ये ब्रोकोली पेरणीसाठी ४०० ते ५०० ग्रॅम बियाणे आवश्यक आहे. त्याचे बियाणे कृषी संशोधन केंद्र, बियाणे स्टोअर किंवा ऑनलाइन खरेदी करता येते. त्याची लागवड करताना शेतकऱ्यांनी त्याची रोपे ३० सेमी अंतरावर लावावीत आणि दोन ओळींमधील अंतर ४५ सेमी ठेवावे. आपल्या कृषी सहाय्यकाकडून याची चांगली माहिती मिळेल.

# कांद्याचे संतुलित पोषण महत्त्वाचे

सुधारित जातींच्या बियाण्यांच्या अभाव, संतुलित खत व्यवस्थापनाचा अभाव, पीकवाढीच्या महत्त्वाच्या काळात पाण्याचा तुटवडा,कीड,रोगांमुळे होणारे नुकसान आणि सुधारित लागवड तंत्राचा कमी वापर या कारणांमुळे कांद्याच्या उत्पादकता कमी झाली आहे.

उत्पादनातील समस्या : १) एकसमान आकाराचे कांदे कमी तर चिंगळी कांद्याचे प्रमाण जास्त. यामुळे चांगला बाजारभाव मिळत नाही. २) जोड कांदा, डेंगळा कांद्याचे जास्त प्रमाण. ३) साठवणुकीत बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव. त्यामुळे कांदा साठवणुकीत सुद्धा कमी काळ टिकतो. साठवणुकीत २०ते ४० टक्के नुकसान.

४) उत्पादन आणि गुणवत्तेमध्ये घट. : कांद्याच्या दर्जेदार व गुणवत्तापूर्ण उत्पादनासाठी कांद्याचे संतुलित पोषण व्यवस्थापनाबरोबरच सुधारित लागवड तंत्राचा वापर महत्त्वाचा आहे. योग्यवेळी शिफारशीत जातींची योग्य अंतरावर लागवड, योग्यवेळी तण व्यवस्थापन, पीकवाढीच्या महत्त्वाच्या काळात पाण्याचा योग्य वापर, वेळेवर कीड आणि रोग व्यवस्थापन केल्यास दर्जेदार व गुणवत्तापूर्ण उत्पादन घेता येते. संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापनासाठी पोषक घटकांचा योग्य स्रोत, योग्य मात्रा, वापराचे योग्य ठिकाण आणि घटकांचा पुरवठ्यासाठी पिकाच्या वाढीचा योग्य टप्पा लक्षात घ्यावा.

असंतुलित पोषणाचे दुष्परिणाम : कांदा पिकास खते देताना शिफारशीत अन्नद्रव्यांची मात्रा माहिती नसल्याने अंमलबजावणी होत नाही. विविध अन्नद्रव्यांचा वापर माती परीक्षणाच्या शिफारशीनुसार होत नाही. अन्नद्रव्यांचे एकसारखे मिश्रण होत नाही आणि हेच मिश्रण पिकास दिल्यावर ते पिकाच्या मुळाजवळ एकसारखे पडत नाही. पोषणतत्त्वांच्या असमान वाटपामुळे पिकाचे संतुलित आणि संपूर्ण पोषण व्यवस्थापन होत नाही. परिणामी उत्पादन घटते. साठवणुकीत कांद्याचे मोठे नुकसान होते.तसेच जमिनीच्या सुपीकतेवर परिणाम होतो. कार्यक्षम अन्नद्रव्यांचा अत्यल्प वापर होतो.



अन्नद्रव्यांचा योग्य वापर : १) सातत्याने पीक लागवड आणि मशागतीसाठी अशाश्वत पद्धतींच्या वापरामुळे जमिनीतील सेंद्रिय कर्बाचा दिवसेंदिवस अतिशय तीव्रगतीने ऱ्हास होत आहे. सेंद्रिय कर्बाच्या कमतरतेमुळे जमिनीतील सूक्ष्म जिवाणूंची प्रक्रिया मंदावते. सेंद्रिय कर्बाच्या कमतरतेमुळे जमिनीतील अन्नघटकांची उपलब्धता आणि पोषण कमी होते. असंतुलित अन्नद्रव्यांच्या पोषणामुळे पिकाच्या उत्पन्नात घट येते, गुणवत्ता खालावते.

२) लागवड करताना खताचा बेसल डोस देण्यासाठी लागणारी खते योग्य वेळेवर आणि योग्य मात्रेत उपलब्ध करणे गरजेचे आहे. पिकाच्या सुरवातीच्या दिवसांमध्ये पिकाला चांगली मुळी फुटणे फार महत्त्वाचे असते. त्यामुळे पिकाचा जमिनीच्यावरील भागाचा विकास चांगला होतो. बेसल डोसमध्ये प्रामुख्याने पिकाच्या मुळांसाठी आवश्यक स्फुरद, नत्र, सूक्ष्म अन्नघटकांचा समावेश असतो. त्यामुळे पिकाची मुळे चांगली फुटतात. त्यामुळे अन्नघटकांचे पोषण चांगल्या प्रकारे होते. पिकाच्या जोमदारवाढीसाठी चांगली चालना मिळते. त्याचा चांगला परिणामी पिकाच्यापुढील वाढीच्या टप्प्यामध्ये होतो. पिकाची मुळे चांगली वाढलेली असतील तर रोपांची जोमदार वाढ होऊन कांद्याची चांगली वाढ होते. ३) बेसल डोस मातीत चांगला मिसळला पाहिजे. बेसल डोस हा लागवडीच्या वेळेस किंवा लागवड झाल्यानंतर जास्तीत जास्त १० ते १५ दिवसांनी दिला पाहिजे. त्यामुळे पिकाची जोमदार वाढ होऊन त्याचा चांगला परिणाम म्हणून एकसमान आकाराचे कांदे मिळतात.

# अळींबी लागवड;शेतकऱ्यांना कमी खर्चात बंपर नफा

आळंबी ही बुरशी गटातील एक वनस्पती असून याची लागवड प्रामुख्याने पूर्व आशिया तसेच तैवान, चीन, कोरिया तसेच इंडोनेशिया इत्यादी देशात मोठ्या प्रमाणावर केली जाते. भारतामध्ये देखील आळंबीचे उच्च तंत्रज्ञानावर आधारित उत्पादन सुरू झाले असून आता व्यावसायिक दृष्टिकोनातून आळंबी उत्पादन शेतकरी बंधू करू लागले आहेत. आळंबी लागवडीसाठी चांगले स्पॉन अर्थात बी तयार करणे हा शेतीसाठी एक चांगला पूरक उद्योग धंदा ठरू लागला आहे.

महिला वर्गासाठी हा व्यवसाय खूप महत्त्वपूर्ण असून महिलांसाठी आर्थिक स्थैर्य देण्याची क्षमता या व्यवसायात आहे. या लेखामध्ये आपण आळंबी लागवडीसाठी आवश्यक असणाऱ्या बाबींची माहिती करून घेणार आहोत.

आळंबी लागवडीसाठी आवश्यक बाबी

लागणारी जागा– आळंबी उत्पादना करता जागा ही बंदिस्त स्वरूपाची आवश्यक असते. यासाठी झोपडी किंवा बांबू हाऊस किंवा एखादे मातीचे घर यामध्ये आळंबी उत्पादन अत्यंत उत्तम पद्धतीने घेता येते व त्या माध्यमातून चांगला नफा देखील मिळतो.

पाण्याच्या आवश्यकता– आळंबी उत्पादनासाठी पाणी ही एक अत्यंत महत्त्वाची बाब असून आळंबी उत्पादनाकरिता पाणी स्वच्छ व शुद्ध असणे खूप गरजेचे असते. नाहीतर उत्पादनावर विपरीत परिणाम संभवतो.



आळंबी उत्पादनासाठी लागणारा कच्चामाल– आळंबी उत्पादनासाठी कच्चामाल म्हणून गव्हाचा भुसा, कपाशीच्या पराट्या, भाताचा पेंडा तसेच गवत, सोयाबीनचा भुसा आणि कडबा इत्यादी शेतातीलच कच्चामालाची आवश्यकता असते.

आळंबी चे सगळे उत्पादन हे कच्च्या मालावर अवलंबून असल्यामुळे कच्च्या मालातील सेल्युलोज हा घटक आळिंबीचे प्रमुख अन्न आहे. सेल्युलोज ज्या घटकात अधिक असते त्यावर आळंबीचे उत्पादन अधिक येते. असे घटक पदार्थांची निवड करताना ते कोरडे असणे खूप गरजेचे असून हे नवीन काढणीचे असावेत. पावसात भिजलेले नसावेत.

प्लास्टिक आवश्यक– आळंबी उत्पादनाकरिता प्लास्टिक पॉली प्रोपीलिनचे यांचे वापरावे लागते. त्याची गेज ८० ते १०० इतके असावी. प्लास्टिकचा आकार १८ बाय २२ इंच किंवा २२ बाय २७ इंचाचा असावा.

आळिंबीची बियाणे– आळंबीच्या बियाण्यास स्पॉन असे म्हणतात. गव्हाच्या दाण्यावर आळंबीच्या बिजाणूंची वाढ केली जाते व प्लॅस्टिकच्या पिशवीत ५०० ग्राम, एक किलो या मापामध्ये हे बियाणे उपलब्ध असते.

लागणारे वातावरण– आळंबीच्या आपल्या उत्पादनासाठी वातावरण हे अंधकारमय असणे गरजेचे आहे. हवेतील आद्रता ७० ते ८०% व तापमान १८ ते २८ असावे. चांगल्या उत्पादनाकरिता खेळते हवा असणे खूप महत्त्वाचे आहे. लागणारी यंत्रसामग्री– आळंबी उत्पादनासाठी जास्त मोठ्या प्रमाणात यंत्रसामग्री लागत नसून यामध्ये कच्चामाल भिजवण्यासाठी ड्रम, पाणी गरम करण्याकरता हिटर, वातावरण नियंत्रित करण्यासाठी ह्यूमिडी फायर व फॉगर्स, आळंबी वाढवण्याकरता ड्रायर, तापमान नोंद ठेवण्याकरिता थर्मामीटर, आद्रता दर्शवण्याकरिता हेअर हायग्रोमीटर तसेच फॉरमेलीन व बुरशीनाशक तसेच डाळीचे पीठ इत्यादीची आवश्यकता असते.




## जागतिक दिवस: ब्रम्हदेश (म्यानमार) चा मुक्तिदिन

### महत्वाच्या घटना

१४९३ : क्रिस्तोफर कोलंबस त्यांच्या पहिल्या सफरीच्या शेवटी नव्या जगातून परत निघाले.
१६४१ : कर भरायला नकार देणाऱ्या लोकप्रतिनिधींना पकडण्यासाठी इंग्लंडचा राजा पहिला चार्ल्स हाऊस ऑफ कॉमन्समध्ये शिरला. या अभूतपूर्व घटनेची परिणती यादवी युद्धात झाली. त्यात चार्ल्सचा पराभव होऊन मग त्याचा शिरच्छेद करण्यात आला.
१८४७ : सॅम्युअल कॉल्टने अमेरिकन सरकारला पहिले रिव्हॉल्व्हर पिस्तुल विकले.
१८८१ : लोकमान्य टिळक यांनी पुणे येथे 'केसरी' या वृत्तपत्राची सुरूवात केली.
१८८५ : आंत्रपुच्छ काढून टाकण्याची पहिली यशस्वी शस्त्रक्रिया डॉ. विल्यम डब्ल्यू. ग्रांट यांनी मेरी गार्टसाईड या रुग्णावर केली.
१९२६ : क्रांतिकारकांच्या गाजलेल्या काकोरी खटल्याच्या सुनावणीस लखनौ येथे सुरुवात झाली.
१९३२ : सविनय कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतल्याबद्दल पंडित नेहरूंना दोन वर्षांची शिक्षा
१९३२ : जवाहरलाल नेहरूआणिमहात्मा गांधीयांना इस्ट इंडिया कंपनी चे तेव्हाचे व्हाईस रॉय विलिंगडन यांनी अटक केली.
१९४४ : १० वर्षावरील सर्व मुलामुलींना राष्ट्राच्या युद्धसेवेत दाखल करुन घेण्याबद्दलचा हिटलरचा वटहुकूम जारी झाला.
१९४८ : ब्रम्हदेश (म्यानमार) ला (इंग्लंडपासून) स्वातंत्र्य मिळाले.
१९५२ : ब्रिटिश सैन्याने सुएझ कालव्याची नाकेबंदी केली.
१९५४ : मेहेरचंद महाजन यांनी भारताचे ३ रे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९५८ : १९५३ मध्ये माउंट एव्हरेस्टवर यशस्वी चढाई करणारे सर एडमंड हिलरी दक्षिण धृवावर पोहोचले.
१९५८ : स्पुटनिक-१ हा पहिला मानवनिर्मित उपग्रह पृथ्वीवर परत उतरला.
१९५९ : लूना – १ हे अंतराळयान चंद्राच्या अगदी जवळ पोहोचले.
१९६२ : न्यूयॉर्क अमेरिका येथे पहिली चालकरहित रेल्वे सुरु झाली.
१९७२ : दिल्लीला क्रिमिनोलॉजी आणि फॉरेन्सिक विज्ञान संस्थेचे उद्घाटन.
१९९० : पाकिस्तान मध्ये दोन ट्रेन एकमेकांना धडकल्या मुळे ४०० लोक मारल्या गेले आणि ५०० पेक्षा अधिक लोक जखमी झाले.
१९९६ : साहित्यिक चंद्रकांत खोत यांच्या 'बिंब प्रतिबिंब' या कादंबरीला कोलकता येथील भारतीय भाषा परिषदेचा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाला.
२००४ : नासाची मानवरहित स्पिरीट ही गाडी मंगळ ग्रहावर उतरली.
२०१० : 'बुर्ज खलिफा' या जगातील सर्वात उंच इमारतीचे उद्घाटन

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६४३ : इंग्लिश शास्रज्ञ आणि तत्त्वज्ञानी सर आयझॅक न्यूटन यांचा जन्म.
१८०९ : लुई ब्रेल – अंधांना उपयोगी पडणाऱ्या ब्रेल लिपीचे जनक व शिक्षक (मृत्यू: ६ जानेवारी १८५२)
१८१३ : सर आयझॅक पिटमॅन – शॉर्टहँड या लघुलिपीचे जनक (मृत्यू: १२ जानेवारी १८९७)
१८८७ : ला प्रसिद्ध लेखक लोचन प्रसाद पाण्डेय यांचा जन्म.
१८९२ : ला भारतीय अर्थशास्त्रज्ञ जे.सी. कुमारप्पा यांचा जन्म.
१९०० : अमेरिकन पक्षीय जेम्स बाँड यांचा जन्म.
१९०९ : मराठी नवसाहित्यिकार प्रभाकर पाध्ये यांचा जन्म.
१९१४ : इंदिरा संत साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या कवयित्री व लेखिका (मृत्यू: १३ जुलै २०००)
१९२४ : विद्याधर गोखले – नाटककार व संपादक (मृत्यू: २६ सप्टेंबर १९९६)
१९२५ : प्रदीप कुमार – हिन्दी व बंगाली चित्रपटसृष्टीतील अभिनेता (मृत्यू: २७ आक्टोबर २००१)
१९३१ : ला भारतीय चित्रपट अभिनेत्री निरुपा रॉय यांचा जन्म.
१९४० : मराठी कादंबरीकार श्रीकांत सिनकर यांचा जन्म.
१९४१ : कल्पनाथ राय – केन्द्रीय मंत्री, राज्यसभा खासदार (३ वेळा), लोकसभा खासदार (४ वेळा), काँग्रेसचे नेते (मृत्यू: ६ ऑगस्ट १९९९ नवी दिल्ली)
१९६५ : भारतीय चित्रपट अभिनेते आदित्य पंचोली यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७५२ : गॅब्रिअल क्रॅमर – स्विस गणिती (जन्म: ३१ जुलै १७०४)
१८५१ : दुसरे बाजीराव पेशवे यांचे निधन.
१९०७ : गोवर्धनराम त्रिपाठी – गुजराथी लेखक, 'सरस्वतीचंद्र' हा गाजलेला चित्रपट त्यांच्याच चार भागांतील कादंबरीवर आधारलेला आहे. (जन्म: २० आक्टोबर १८५५ नडियाद, गुजराथ)
१९०८ : राजारामशास्त्री भागवत – विद्वान व समाजसुधारक, ज्ञानाच्या क्षेत्रातील मोठे प्रज्ञावंत, शिक्षणविषयक स्वतंत्र ध्येये असल्यामुळे त्यांनी १८८४ मध्ये बॉम्बे हायस्कूल आणि पुढे मराठा हायस्कूल काढले. हिन्दूधर्म विवेचक पत्राचे ते काही वर्षे संपादक होते. (जन्म: ११ नोव्हेंबर १८५१ कशेळी, राजापूर, रत्नागिरी)
१९३१ : ला भारताचे प्रसिद्ध पत्रकार मुहम्मद अली यांचे निधन.
१९६१ : आयर्विन श्रॉडिंगर – नोबेल पारितोषिक विजेता ऑस्ट्रियन भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: १२ ऑगस्ट १८८७)
१९६५ : टी. एस. इलियट – अमेरिकेत जन्मलेले ब्रिटिश कवी, नाटककार, टीकाकार आणि नोबेल पारितोषिक विजेते (जन्म: २६ सप्टेंबर १८८८)
१९९४ : राहूलदेव बर्मन तथा 'पंचमदा' – संगीतकार (जन्म: २७ जून १९३९)
२०१६ : ला भारताचे ३८ वे न्यायाधीश एस. एच. कपाड़िया यांचे निधन.

## थोडक्यात



### केंद्रीय प्राथमिक शाळेत सावित्रीबाई फुले यांची जयंती

माजलगाव ( प्रतिनिधी ) तालुक्यातील मोठेवाडी येथील जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.प्रथमता: ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाथा रासवे हे होते तर मुख्याध्यापक तुकाराम शिंदे, माजी सरपंच विष्णु खेत्री, संभाजी पास्टे, उपाध्यक्ष विलास खेत्री, प्रभाकर खेत्री,सर्जेराव करपे, परमेश्वर खेत्री,यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी संभाजी पास्टे यांनी विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले यांचा जीवनपट उलगडून सांगतिला.शाळेतील मुलींनी सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा साकारून उपस्थितांचे मने जिंकली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षक संतोष जगताप यांनी केले तर सुत्रसंचालन कु. दृष्टी कदम, कु.श्वे्ता खेत्री व आभार मुख्याध्यापक तुकाराम शिंदे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक उत्तम ढवळे,आर.पी.राठोड,मधुकर वाघमारे, लक्ष्मीनारायण परदेशी, राजेभाऊ सोगे, अंजली तांदळे व शाळेतील विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.यावेळी ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती

### मोठेवाडी ग्रामपंचायत कार्यालयात सावित्रीबाई फुले यांची जयंती

माजलगाव ( प्रतिनिधी ) तालुक्यातील मोठेवाडी येथील ग्रामपंचायत कार्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची



जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.प्रथमता: ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच अविनाश गोंडे हे होते तर ग्रामसेवक बिभीषण डोरले, माजी सरपंच विष्णु खेत्री,संभाजी पास्टे,समता परिषदेचे तालुकाध्यक्ष जगन्नाथ खेत्री,अंगद खेत्री,बालाजी करपे,प्रभाकर खेत्री,चक्रधर हिवरकर,राजेभाऊ घोडके,भिमराव जंगले,तुकाराम खेत्री,दिनकर खेत्री यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक संभाजी पास्टे यांनी केले तर आभार गणेश सर्जे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रकाश शेळके, गणेश पास्टे,प्रदीप खेत्री यांनी परिश्रम घेतले.यावेळी ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### घाटनांदुर येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती

घाटनांदुर : शिक्षणापासून वंचित असलेल्या स्त्रियांसाठी समाजात शिक्षणाची ज्योत पेटवणाऱ्या पहिल्या शिक्षका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त घाटनांदुर येथील क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले चौक या ठिकाणी सकाळी १० वा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून व श्रीफळ फोडून अभिवादन करण्यात आले यावेळी सरपंच महेश गारठे,श्रीकिशन आरसुडे,नारायण आरसुडे ,पवन दरगड,भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रदीप वैद्य,रवींद्र आरसुडे,गणेश काटुळे,विलास शिनगारे,विशाल आरसुडे,महादेव कांबळे,महेश आरसुडे,बाळु आरसुडे,गणेश आरसुडे, चंद्रकांत आव्हाड,चक्रधर आरसुडे, व सर्व समाज बांधव,गावकरी मोठ्या उपस्थितीत होते.

### सोमवारी लोकशाही दिन

बीड : जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दिनांक ६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १०-०० ते दुपारी १२-०० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन करण्यात आला आहे. लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसिलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी यापूर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नयेत.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/८५५
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- २४/१२/२०२४

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) शहाजा अजिम शेख रा. अंबड ता. अंबड जि जालना सि.स.नं. १४५४ न.प.मि.न.९-१४५/१ चे वारसा अधारे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (९-१४५/१) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- सरकारी रस्ता
पश्चिम :सरकारी रस्ता
दक्षिण- शेख कयूम शेख अब्दुल्ला
उत्तर : बडे खॉ महेबद खॉ यांचे घर

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

# महिला कला महाविद्यालय वाचन कौशल्य कार्यक्रम

## वाचनाने विचारांना प्रेरणा मिळून व्यक्तिमत्व विकसित होते-डॉ.पाटांगणकर

बीड । प्रतिनिधी

येथील माऊली विद्यापीठ संचलित महिला कला महाविद्यालय बीड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग, ग्रंथालय विभाग व दिनविशेष समितीद्वारे दि.०३/०१/२०२५ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती व '' वाचन संकल्प महाराष्ट्राचा'' अंतर्गत वाचन कौशल्य या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या मा. प्राचार्य डॉ.संध्या आयस्कर, मार्गदर्शक डॉ. विद्यासागर पाटांगणकर, डॉ.बबन बोबडे ( रासेयो कार्यक्रमाधिकारी) , श्री. राजेंद्र लोमटे ( ग्रंथपाल) यांची विचार मंचावर उपस्थिती होती.





कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर यांनी केले प्रास्ताविकातून सावित्रीबाई फुले यांच्या जीवन व शैक्षणिक कार्यासंबंधी सखोल माहिती दिली. मुलींच्या शिक्षणासाठी सावित्रीबाई फुलेंचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्यामुळे मुलींना आज शिक्षण घेता येत आहेअसे सांगितले. त्यानंतर वाचन कौशल्या विषयी माहिती देताना '' वाचन संकल्प महाराष्ट्राचा'' अभियानांतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन केले असून विद्यार्थिनींना वाचनाची सवय लागावी यासाठी कोणती पुस्तके घ्यावीत आणी पुस्तके कसे वाचावीत याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थीनींनी महाराष्ट्र शासनाच्या या अभियानातील सर्व उपक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभाग घेऊन स्वतःला विकसित करावे, स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी, स्वावलंबी होण्यासाठी प्रयत्न करावेत असे सांगितले. कार्यक्रमाचे मार्गदर्शन डॉ. विद्यासागर पाटांगणकर यांनी मार्गदर्शनातून सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. महिलांच्या शिक्षणासाठी त्यांनी खूप खस्ता खाल्ल्या. लोकांनी त्यांच्यावर चिखल फेक करण्याचा प्रयत्न केला. तरी देखील त्यांनी न डगमगता शिक्षणाचे कार्य अविरत करीत राहिल्या .वाचन संकल्प महाराष्ट्राचा'' या अभियाना अंतर्गत वाचन कौशल्यावर मार्गदर्शन करताना वाचनाचे महत्त्व सांगताना. सतत पुस्तके वाचणे आवश्यक आहे. पुस्तके हे मुद्रित स्वरूपात असतात. पुस्तकातील अक्षरांचे ज्ञान कळणे महत्त्वाचे आहे. पुस्तक इतके वाचले पाहिजे की ,ती फाटले पाहिजे, पुस्तके ग्रंथालयातील कपाटात न ठेवता ते वाचले गेले पाहिजे. माणसाने सतत लेखन केले पाहिजे. दिवसातून काहीतरी लेखन करणे गरजेचे आहे. वाचन करताना तल्लीन झाले पाहिजे. नीतिमत्तेचा धडा वाचण्यात मिळतो, वाचनाने विचाराला प्रेरणा दिली पाहिजे, वाचनाने विकसित होता येते, व्यक्तिमत्व विकास याविषयी सविस्तर आणि सोदाहरण मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. बबन बोबडे ( रासेयो कार्यक्रमाधिकारी) यांनी केले.तर आभार श्री. राजेंद्र लोमटे ( ग्रंथपाल) यांनी मानले. कार्यक्रमासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी यांचे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महिलांना सन्मानाचे स्थान मिळाले पाहिजे - प्रा. कावेरी खुरणे

पाटोदा । प्रतिनिधी

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंच्या अथक परिश्रमांमुळे व संघर्षामुळेच शिक्षणाची दारे खुली झाली व आजची महिला शिक्षित होऊन स्वावलंबी बनू शकली. महिला आज समाजातील प्रत्येक क्षेत्र पादाक्रांत करत पुढाकार घेत आहे तरीही आजही महिलांना अनेक प्रसंगी उपेक्षेला सामोरे जावे लागते व अन्याय सोसावा लागतो म्हणून महिलांना खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे की नाही असा प्रश्न निर्माण होतो. समाजाची महिलांविषयीची मानसिकता बदलली पाहिजे व महिलांना सन्मानाचे स्थान मिळाले पाहिजे असे प्रतिपादन प्रा. कावेरी खुरणे यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील महाविद्यालयात ३ जानेवारी



रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यान कार्यक्रमात त्या प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते, व्यासपीठावर कमवि उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण उपस्थित होते. महिला सक्षमिकरण व अंतर्गत तक्रार कक्षाच्या तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात सर्वप्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाल्यार्पण प्राचार्यांच्या हस्ते संपन्न झाले. यानंतर सावित्रीबाई फुलेंचा कार्यगौरव करणारे स्वागतगीत कु. राजकन्या कोकाटे, शिवकन्या भोसले, विमल उगलमुगले, सुविधा पवार, श्रावणी घुमरे या विद्यार्थिनींनी सादर केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांमधून आरती देवकर, रोहित नागरगोजे, वैभव सस्ते, राजकन्या कोकाटे या विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले.अध्यक्षीय समारोपात प्राचार्य आबासाहेब हांगे म्हणाले की, केवळ ज्ञान व शिक्षणाच्या बळावर एक महिला कितीही अशक्यप्राय वाटणारे कार्य करू शकते. देशाच्या इतिहासात अनेक महिलांनी आपले श्रेष्ठत्व व कर्तबगारी सिद्ध केलेली आहे. म्हणून सातत्याने महिलांनी ज्ञान व शिक्षण मिळवून अधिकाधिक बलवान बनले पाहिजे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सोमनाथ लांडगे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. मनिषा गाढवे यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. अजिंक्य साखरे यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## भ्रष्टाचार निर्मुलन समिती बैठक

**बीड। प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समिती बीड तथा जिल्हाधिकारी बीड यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दि. ६ जानेवारी २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ११. ०० वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. बीड जिल्हयातील शासकीय कर्मचा-याविरुध्द प्राप्त होणा-या तक्रारींबाबत पाठपुरावा करण्यासाठी जिल्हास्तरीय भ्रष्टाचार समिती स्थापन करण्यात आली असून त्याअनुषंगाने नागरिकांनी शासकीय अधिकारी, कर्मचा-याविरुध्द भ्रष्टाचारासंबधी तक्रार असल्यास जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीसमोर व्यक्तीश: उपस्थित राहून लेखी स्वरुपात मांडाव्यात सदर तक्रारीसोबत पुरावे जोडले गेले नसल्यास अशा तक्रारी घेतल्या जाणार नाहीत, असे सदस्य सचिव जिल्हा भ्रष्टाचार निवारण समिती तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

## श्रीसमर्थ रामदासस्वामी पादुकापूजन सोहळ्याचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रगुरु श्रीसमर्थ रामदासस्वामी यांच्या विचार व कार्याची महती अवघ्या महाराष्ट्राला परिचित आहे. कर्म, उपासना, ज्ञान आणि मोक्ष या चतुसूत्री वर आधारित कर्मनिष्ठ जीवन प्रणाली या श्री समर्थ विचारांचा प्रचार व प्रसार करण्याच्या मुख्य हेतूने श्रीक्षेत्र सज्जनगडावरून श्रीरामदासस्वामी संस्थान तर्फे भिक्षा दौरा आयोजित केला जातो. समाजाच्या एकत्रिकरणसाठी उत्सव ,महोत्सव साजरे करताना समाजाच्या प्रत्येक घटकाच्या सहकार्यातून व सहभागातून ही साजरे व्हावे म्हणून श्रीसमर्थानीं भिक्षेचा दंडक घालून दिला, आज३७७ वर्षानंतर सुद्धा ही परंपरा कायम आहे.

या सांप्रदायिक भिक्षा फेरीचे आणि चरणपादुका पूजनाच्या भव्य सोहळ्याचे आयोजन २४ ते ३१ जानेवारी या सप्ताहात भव्य स्वरूपात साजरा करण्याचे आयोजन झाले असून २४ जानेवारी शुक्रवार रोजी श्री समर्थ रामदास स्वामी चरणपादुकांचे भव्य स्वागत बीड शहराच्या वतीने केले जाणार आहे , श्री समर्थांचे अकरावे वंशज,अध्यक्ष व अधिकारी स्वामी श्री रामदास स्वामी संस्थान सज्जनगड श्री भूषण स्वामी महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभत आहे. समर्थचरणपादुकांचा मुक्काम ३१ जानेवारीपर्यंत श्रीमद जनीजनार्दन संस्थान थोरले पाटांगण येथे राहणार आहे, या दौऱ्या दरम्यान काकड आरती, सूर्यनमस्कार, भजन, कीर्तन ,प्रवचन सांप्रदायिक उपासना व शेजारती असे कार्यक्रम होणार आहेत. दररोज सकाळी ८ ते १२ या वेळेत शहराच्या विविध भागातून भिक्षेचा कार्यक्रम होणार आहे. तसेच श्री समर्थ चरणपादुकांचे सामुदायिक पूजन व वैयक्तिक पादुका पूजन घरोघरी नियोजन होत आहे, तरी या सुवर्णसंधीचा सर्व धर्मप्रेमी,समर्थ भाविक भक्तांनी अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन ह. भ. प. विनायक महाराज पाटांगणकर ,प्रा.डॉ. दीपक देशमुख सर, ह. भ. प. कृष्णामहाराज रामदासी आणि संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## पोलीस उपनिरीक्षक परमेश्वर सानप सेवानिवृत्त

### अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्याकडून सत्कार



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा पोलीस दलाचे पोलीस उपनिरीक्षक परमेश्वर सिताराम सानप हे ३१ डिसेंबर २०२४ रोजी पोलीस उपनिरीक्षक पदावरून सेवानिवृत्त झाले. या सेवानिवृत्तीबद्दल त्यांचा पोलिस अधीक्षक नवनीत कावत ,अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस उपाधीक्षक विश्वंभर गोल्डे, एएचटीयू च्या श्रीमती होगाडे आदिंनी त्यांचा सपत्नीक सत्कार केला. त्यानंतर एक जानेवारी रोजी त्यांचा हॉटेल गोल्डन चॉईस मध्ये सेवानिवृत्तीचा कार्यक्रम संपन्न झाला.

१ जानेवारी १९६७ साली जन्मलेले परमेश्वर सानप यांनी एम. कॉम. पर्यंत शिक्षण पूर्ण केले .त्यानंतर ते पोलीस दलात भरती झाले. सन २०१३ साली त्यांनी पोलीस उपनिरीक्षक पदाची खाते अंतर्गत परीक्षा दिली .त्यांना एक ऑगस्ट २०२४ रोजी पदोन्नती आदेश दिले. त्यांनी आपल्या कार्यकाळात मोठी कामगिरी केलेली आहे .मे २०१८ साली पोलीस महासंचालक मुंबई यांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले होते .सन २०१२ मध्ये नाशिक डीटीएच सेंटर मधून महाराष्ट्रातून ते प्रथम आले. त्यांनी आपल्या कार्यकाळात अनेक गुन्ह्याचे तपास लावले .अनेक गुन्ह्यांमध्ये आरोपींना जन्मठेपेची शिक्षा झाली. त्यांनी आपल्या कार्यकाळात बीड पोलीस उपाधीक्षकांचे सहाय्यक म्हणून सोळा वर्षे, अंबाजोगाई पोलीस उपाधीक्षकांकडे चार वर्ष, एलसीबी मध्ये दहा वर्ष ,याबरोबरच नेकनूर पोलीस ठाण्यात दोन वर्षे आपली सेवा दिली. पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती झाल्यानंतर त्यांना पाच महिन्याचा कार्यकाळ मिळाला. या काळातही त्यांनी चांगली कामगिरी केली.उपनिरीक्षक या पदावरून ते ३१ डिसेंबर २०२४ रोजी सेवानिवृत्त झाले. या सेवानिवृत्तीबद्दल त्यांचा पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस उपाधीक्षक विश्वंभर गोल्डे, एचटीयूच्या श्रीमती व्हगाडे, जिल्हा वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सानप, पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर ,जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते नितीन कोटेचा,बप्पासाहेब घुगे आदींनी त्यांचा सत्कार केला.त्यानंतर त्यांचा सत्कार समारोह हॉटेल गोल्डन चॉईस या ठिकाणी १जानेवारी२०२४रोजी मोठ्या दिमाखात संपन्न झाला.

## लिंबागणेश येथे गतिरोधकासाठी ठिय्या आंदोलन

### तहसीलदार शेळकेंच्या आश्वासनानंतर आंदोलन मागे

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील अहमदपूर ते अहिल्यानगर राज्यमार्ग क्रमांक ५४८ डी मार्गावरील अपघात प्रवण क्षेत्र असलेल्या भालचंद्र माध्यमिक विद्यालयासमोर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी गतिरोधक बसविण्यात यावेत या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे आणि पत्रकार हरीओम क्षीरसागर व ग्रामस्थांनी आक्रमक होत भालचंद्र विद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन केले.



राज्य मार्गावर येळंबघाट येथे ग्रामस्थांच्या मागणीवरून एचपीएम कंपनीने गतिरोधक बसवलेले असताना मांजरसुंभा ते चुंभळीफाटा मार्गाचे कंत्राटदार असणारी एचसीपीएल कंपनीने त्याच धर्तीवर गतिरोधक बसविण्यात यावेत या मागणीसाठी ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेतला. तहसीलदार चंद्रकांत शेळके , अशोक ससाणे उप अभियंता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळ छत्रपती संभाजीनगर यांच्या जिल्हा प्रशासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला असुन लवकरात लवकर गतिरोधक बसविण्यात येतील या आश्वासनानंतर ''ठिय्या आंदोलन'' मागे घेण्यात आले. यावेळी मंडळ अधिकारी अशोक डरपे, एचसीपीएल कंपनीचे प्रतिनिधी दादा बांगर,नेकनुर पोलिस स्टेशनचे ढाकणे ,लिंबागणेश पोलिस चौकीचे पोहे. बाबासाहेब डोंगरे, नवनाथ मुंडे, भालचंद्र विद्यालयाचे मुख्याध्यापक किसन सावंत, पर्यवेक्षक हावळे, सहशिक्षक मूकुंद मोटे, गणेश आजबे, सचिन. वाणी ,मुळुकवाडीचे माजी सरपंच कृष्णा पितळे, अवधूत ढास,पिंपरनईचे सरपंच बाळासाहेब वायभट, अभय वनवे, गणेश जाधव, महावीर जाधव आदी उपस्थित होते.

# जय जवान विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती व बालिका दिन साजरा

वडवणी । प्रतिनिधी

आज रोजी दि.०३ जानेवारी २०२५ वार शुक्रवार रोजी जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव बू. ता.वडवणी जी.बीड येथील विद्यालयात थोर महान

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली तसेच या जयंती निम्मित बालिका दिन म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रम प्रसंगी प्रमूख उपस्थित मान्यवर व विद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य श्री. देवराम गोगा सारोक्ते सर आदी सर्वांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या पावन प्रतिमेचे पूजन करून हार व पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले, तसेच कार्यक्रमाची प्रस्ताविक ताले सर यांनी



केले तर कार्यक्रमाचे सूत्र संचालन विद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.चोपडे सर यांनी केले.त्याच बरोबर या कार्यक्रमासाठी विद्यालयातील वर्ग ८ ते १२ वी मधील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्या मधुन पूजा बंडगर ,अमृता करे, उम्मेअक्सा शेख, पल्लवी करे या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट पणे आपले मनोगत व्यक्त केले. त्याच बरोबर सर्व शिक्षक वृंद यांनीही आपले मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले.विद्यालयातील मुख्याध्यापक/प्राचार्य सर यांनी आपल्या मनोगतातून स्त्री शिक्षणाचे महत्त्व, आजच्या आधुनिक तंत्रज्ञान युगातील महिला या बाबत मार्गदर्शन करताना भारतातील पहिल्या शिक्षिका, मुख्याध्यापिका, स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या,विद्येची जननी व समस्त स्रियांना उजेडाची वाट दाखवणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ज्यांनी स्त्रियांन बद्दल ''चुल आणि मुल'' ही भावना मोडीत काढुन. स्त्री शिक्षणाचा पाया रोवला. आणि स्त्रियांना सन्मानाचे जीवन मिळवुन दिलं. आजची स्त्री ही कोणत्याही क्षेत्रांत मागे नाही. स्त्रियांची जीवन शैली ज्यांनी पुर्ण पणे बदलली अश्या स्त्री शिक्षणाची आराध्य दैवत भारतातील प्रथम शिक्षिका, प्रथम मुख्यध्यापिका, ज्ञानज्योती सावीत्रीबाई फुले यांचा जयंती निमित्त त्यांचे कार्य व जीवन परिचय करून दिला.व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.तसेच या कार्यक्रमासाठी गावातील प्रतिष्ठित नागरिक, ज्येष्ठ नागरिक, शिक्षणप्रेमी,पालक वृंद, माजी विद्यार्थी, नागरीक उपस्थित होते.तसेच विद्यालयातील मुख्याध्यापक/प्राचार्य सर,घाडगे सर, टाले सर,हंगे सर, यादव सर,येवले सर, चोपडे सर,तौर मॅडम, मुंडे सर, गोंदरे,पाखरे, काळे,ससाणे, आदी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होते.तसेच मराठी विभाग प्रमुख श्री. यादव सर यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन व्यक्त केले व कार्यक्रमाची सांगता झाली.अशा महान विद्या देवतेला विनम्र अभिवादन

# आपले ध्येय उच्च ठेवा आणि ते प्राप्त करेपर्यंत थांबू नका -आदित्य जीवने




## सावित्रीमाई फुले यांच्या १९४ व्या जयंतीनिमित्त बीड शहरामध्ये विद्यार्थ्यांची शैक्षणिक अभिवादन रॅली काढून सावित्रीमाईंना अभिवादन करण्यात आले

बीड । प्रतिनिधी

आपले ध्येय उच्च ठेवा आणि ते प्राप्त करेपर्यंत थांबु नका. जितका मोठा संघर्ष असतो, तितकेच मोठे यश मिळत असते. एकदा जिंकायची सवय लागली कि माणूस कधीच हारु शकत नाही, जो माणूस हरण्यापासून भितो तो कधीच जिंकू शकत नाही असे प्रतिपादन बीड जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी मा.आदित्य जीवने साहेब यांनी व्यक्त केले. सावित्रीमाई फुले सार्वजनिक जयंती उत्सव समिती, बीड.च्या वतीने आयोजित क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त भव्य अभिवादन रॅली सांगता समारंभ सभेप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड बीड येथे अभिवादन सभा घेण्यात अली याप्रसंगी विचारमंचावर नालंदा फाउंडेशन बीड.चे अध्यक्ष, प्रा. प्रदीप रोडे, प्रमुख मार्गदर्शक म्हणून बीड जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.आदित्य जीवने, बीड जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, श्रीमती श्रावस्ती नारायण मेश्राम, बीड इतर मागास बहुजन कल्याणचे सहाय्यक संचालक, मा.डी.बी.क्षीरसागर, बीड जिल्हा परिषदचे शिक्षणाधिकारी, मा.नानाभाऊ हजारे, अण्णाभाऊ साठे शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष, मा. उत्तम पवार, यशवंत विद्यालयाचे संचालक, मा. गणेश वाघ आदी मान्यवर उपस्थित होते.

क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या १९४ व्या जयंतीनिमित्त सार्वजनिक जयंती उत्सव समिती, बीडच्या वतीने शहरात भव्य अभिवादन रॅली काढण्यात आली.सकाळी ८ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून रॅलीस प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅली ची सुरुवात करण्यात आली. सदरील अभिवादन रॅली माळीवेस मार्गे सावित्रीमाई फुले, क्रांतीबा ज्योतिबा फुले – राजमाता अहिल्या माता होळकर चौक – साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळा चौक – छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौक – मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड येथे सांगता झाली. रॅली मार्गावरील सर्व महापुरुषांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. ढोल ताशाच्या निनादात निघालेल्या रॅलीत महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषेतील विद्यार्थीने सर्वांचे लक्ष वेधले. जय ज्योती, जय क्रांतीच्या घोषाने संपूर्ण परिसर दुमदुमले. या रॅलीच्या माध्यमातून मुलगी वाचवामुलगी शिकवाचा संदेश देत स्त्री शक्तीचा जागर करण्यात आला.पुढे बोलतांना मा.आदित्य जीवने साहेब यांनी सावित्रीमाई

◀◀ पान ३ वर




माजलगाव:- शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त त्यांच्या पावन स्मृतीस अभिवादन करताना माजलगाव मतदार संघाचे आ.प्रकाश सोळंके,शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, भाजपा तालुकाध्यक्ष अरुणराव राऊत, माजी जिल्हा परिषद सदस्य शिवप्रसाद खेत्री,भाजपा भटक्या विमुक्त आघाडीचे प्रदेश सचिव ज्ञानेश्वर सरवदे,मल्हार सेनेचे जिल्हाध्यक्ष अशोक ढोणे,ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विलास नेमाने,ईश्वर खुर्पे, प्रल्हाद दळवी यांची उपस्थिती होती



## विद्यार्थी मित्रांनो वेळेचे नियोजन करायला शिका -बाबासाहेब गोंटे

अंबड । प्रतिनिधी

विद्यार्थी मित्रांनो वेळेला महत्व देण्यासाठी नियोजन करायला शिकले पाहिजे.कारण आपल्या जीवनात वेळ खूपच महत्वाची असून ती आपल्याला अचूकपणे पाळता आली पाहिजे असे आवाहन बाबासाहेब गोंटे यांनी शहरातील विद्यालयात संस्कारदिनाप्रसंगी बोलताना केले संस्थेच्या वतीने शाळेत विद्यार्थ्यासाठी संस्कार दिनाचे आयोजन करण्यात येते.या संस्कार दिनाप्रसंगी पुढे बोलताना बाबासाहेब गोंटे म्हणाले की,जीवनात ◀◀ पान ३ वर



बीड : पहिल्या महिला शिक्षिका, स्त्री शिक्षणाच्या जननी, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती निमित्ताने त्यांच्या स्मारकास अभिवादन करताना बीड विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार संदीप भैय्या क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम साहेब व सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

## जिव्हाळा सावित्रीमाईच्या विचारांचे घर -डॉ.राजीव काळे

**बीड । प्रतिनिधी**

**शहरात जिव्हाळा दीनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत शहरी बेघर निवारा केंद्र येथे ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. जिव्हाळा हे सावित्रीमाईच्या विचारांचे घर असल्याचे प्रतिपादन सावता परिषदेचे प्रदेश प्रवक्ते डॉ.राजीव काळे यांनी केले.**



शिवसेनेचे युवा पदाधिकारी नितीनभैया धांडे यांच्या पुढाकारातून सातत्याने जिव्हाळा येथे वेगवेगळे उपक्रम राबवुन येथील बेघर , निराधारांना आधार देण्याचे काम होत आहे.ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीच्या औचित्यावर नितीन धांडे यांनी जिव्हाळा येथे भोजनाची मदत केली.त्याठिकाणी सावित्रीमाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.प्रमुख पाहुणे म्हणून अलकाताई कल्याण आखाडे, सावता परिषदेचे प्रदेश प्रवक्ते डॉ. राजीव काळे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सीमा बनसोडे, विस्तार अधिकारी तुकाराम जाधव,राजाभाऊ गवळी, चंद्रसेन मनेरी,बाबुराव राऊत,शेख निजाम,राजु महुवाले, रमेश मदने, बाळासाहेब काकडे,शेटे सर आदिजण उपस्थित होते.यावेळी बोलतांना डॉ राजीव काळे म्हणाले की, सावित्रीमाई फुले यांचा विचार फक्त बोलण्यासाठी नाही.त्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करणे इतपत जयंती नाही.तर त्यांच्या विचार घेऊन आचार करणे ही खरी जयंती आहे.त्या विचारांचे आचारण जिव्हाळा येथे होत आहे.

◀◀ पान ३ वर

## आजच्या धावपळीच्या युगात आरोग्य जपणे गरजेचे : डॉ. गौरी कुलकर्णी

आंबेजोगाई । प्रतिनिधी

आजकालच्या धावपळीच्या युगात प्रत्येक जण आपल्या कामात व्यस्त असतो पण उत्तम आरोग्य जपणे हे गरजेचे आहे. यासाठी योग्य आहार सेवन करून आरोग्याकडे लक्ष दिलं पाहिजे असे मत डॉ. गौरी कुलकर्णी यांनी व्यक्त केले .

येथील खोलेश्वर महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.



मंचावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भा.शि.प्र. संस्थेच्या केंद्रीय कार्यकारिणी सदस्या डॉ. कल्पनाताई चौसाळकर, सामाजिक कार्यकर्त्या सौ .पूजा ताई कुलकर्णी तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रीती पोहेकर आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.गौरी कुलकर्णी यांनी आपल्या प्रमुख मार्गदर्शनात वजन नियंत्रण आणि योग्य प्रमाणात आहार तसेच आरोग्य तपासणी नियमित केली पाहिजे असेही त्यांनी सांगितलं. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्याची त्यांनी माहिती दिली.

प्रमुख अतिथी पूजा ताई कुलकर्णी यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्याचा आढावा घेऊन विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचे ग्रंथ वाचले पाहिजेत आणि सावित्रीबाई फुले यांचा वारसा पुढे चालविला ◀◀ पान ३ वर

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त डॉ. सानप भगिनींचा स्तुत्य उपक्रम -जयश्रीताई विधाते

बीड । प्रतिनिधी

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती देशभर मोठ्या उत्साहात बालीका दिन तसेच महिला मुक्ती दिन म्हणून साजरी केली जाते. याच पाश्वभूमीवर सावित्रीमाईचे महिला आणि बालकांविषयीचे शिक्षण आणि आरोग्याचे महान कार्य पहाता त्यांची जयंती हि अशाच उपक्रमाने साजरी व्हावी या हेतुने मा. सभापती तथा नगरसेविका सौ. जयश्रीताई विलास विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली सावित्रीबाई फुले



जयंतीनिमित्त सुप्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ. मोनीका योगेश सानप आणि जनरल फिजीशियन डॉ. गीतांजली निलेश सानप यांच्या दवाखान्यात मोफत बाल-आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आली. या शिबीरात ◀◀ पान ३ वर



माजलगाव:- भारतातील पहिल्या शिक्षिका मुख्याध्यापिका,स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या विद्येची जननी व समस्त स्त्रियांना उजेडाची वात दाखवणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त संघमित्रा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.माजलगाव येथे जयंती साजरी करण्यात आली.यावेळी एस.इन्स्टिट्यूटच्या प्रा. शेळके मॅडम व सर्व कर्मचारी वृंद यांनी स्मृतीस विनम्र अभिवादन केले.

## रोटरी क्लबने २० मुलींना दिले बँकिंग व विमा क्षेत्रातील अभ्यासक्रमाचे मोफत संगणक प्रशिक्षण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सामान्य कुटुंबातील मुली आत्मनिर्भर झाल्या पाहिजेत. या उद्देशाने महिला सक्षमीकरण अंतर्गत २० मुलींना मोफत बँकिंग व विमा क्षेत्रातील अभ्यासक्रमाचे मोफत संगणक प्रशिक्षण रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या वतीने देण्यात आले.



रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व प्रा. संतोष मोहिते यांचे कॉम्पुटर वर्ल्ड यांच्या वतीने सामान्य कुटुंबातील मुली अत्याधुनिक शिक्षण घेऊन आत्मनिर्भर झाल्या पाहिजेत. या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन एच.डी.एफ.सी. ◀◀ पान ३ वर

## गुरुकुल इंग्लिश स्कूल, गेवराई येथे सावित्रीबाई फुलेंची जयंती साजरी

गेवराई । प्रतिनिधी

गुरुकुल इंग्लिश स्कूल अँड ज्यु.कॉलेज मन्यारवाडी रोड, गेवराई येथे क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. दरम्यान यावेळी जयंतीनिमित्त बालसभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या वेशभूषा साकारुन आपले विचार केले.



कार्यक्रमाच्या सर्वप्रथम महात्मा ज्योतिबा फुले व क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी बालसभेच्या अध्यक्षस्थानी कु.मोंढे श्रावणी तर प्रमुख पाहुणे म्हणून महात्मा ज्योतिबा फुले यांच्या वेशभूषेत भोरे यश उपस्थित होते. दरम्यान यावेळी शाळेच्या प्राचार्य सौ.अरुणा ठाकर यांनी क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला त्या म्हणाल्या की, स्त्री म्हणजे चुल आणि मुलचं होते स्त्रियांनी शिकू नये असा पहिला काळ होता परंतू

## आष्टी नगरपंचायतच्या स्वीकृत नगरसेवकपदी अरुण निकाळजे,बाळासाहेब घोडके यांची बिनविरोध निवड

### आ.सुरेश धस यांनी अनुसूचित जातीला न्याय दिल्याने मानले आभार



**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी नगरपंचायतच्या नामनिर्देशित स्वीकृत सदस्यपदासाठी दोन रिक्त झालेल्या जागेसाठी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये आ.सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली दोन्ही ही खंदे समर्थक असलेले रिपाई जिल्हा उपाध्यक्ष तथा नेते अरुण भैय्या निकाळजे व बाळासाहेब घोडके यांची स्वीकृत नगरसेवकपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. आष्टी मतदारसंघाचे आ.सुरेश धस यांनी अनुसूचित जातीला न्याय दिल्याने मानले आभार..

याविषयी नवनिर्वाचित स्वीकृत नगरसेवकांचे उपविभागीय अधिकारी , नगराध्यक्ष , उपनगराध्यक्ष,नगरसेवक,ग्रामस्थ व पदाधिकाऱ्यांनी सत्कार करत अभिनंदन केले छाया शरद रेडेकर



## माजलगाव येथून जागतिक धम्म परिषदेसाठी कार्यकर्ते रवाना

माजलगाव । प्रतिनिधी

येथील सामाजिक कार्यकर्ते दयानंद स्वामी कचरू खळगे विजय साळवे डॉ श्रीराम खळगे दिलीप मकसरे हे बुद्धगया या ठिकाणी दिनांक ०५ जाने. ते ०८ जाने.या दरम्यान संपन्न होणाऱ्या जागतिक धम्म परिषदेच्या केंद्रीय कार्यकारणीच्या निमंत्रणावरून धम्म परिषदेसाठी रवाना झाले असून त्यांना भीम नगर येथे बुद्ध वंदना घेऊन निरोप देण्यात आला.येथील सामाजिक कार्यकर्ते यांना धम्म परिषदेच्या केंद्रीय कार्यकारणी कडून निमंत्रण येण्याची ही पहिलीच वेळ असून धम्माच्या कार्यात सतत अग्रेसर असलेले

◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# आम्ही एकत्र आलो याची राजकीय चिंता करण्याची गरज नाही

चाकण । प्रतिनिधी

पवार साहेब आणि मी एका व्यासपीठावर एकत्र येणार अशा अनेक चर्चा रंगल्या होत्या. आम्ही चांगल्या कामासाठी, कार्यक्रमासाठी एकत्र येतो. आज महात्मा जोतिराव फुले आणि क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरण कार्यक्रमासाठी आम्ही एकत्र आलो हे महत्वाचे आहे.

आम्ही दोघे एकाच व्यासपीठावर एकत्र येणार अशा चर्चा रंगल्या होत्या. अनेकांना त्याचे आश्चर्य वाटले .त्यामुळे राजकीय चिंता करण्याची गरज नाही. असे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी भाषणात आज सांगितले. चाकण ता. खेड येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण आज ज्येष्ठ नेते शरद पवार, माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते झाले. या पूर्णा कृती पुतळ्याच्या अनावरणानंतर जाहीर सभा झाली. त्या सभेत माजी उपमुख्यमंत्री छगन



भुजबळ हे अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. यावेळी आजी, माजी आमदार खासदार व विविध पक्षाचे इतर मान्यवर, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षफुटी नंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांची साथ धरलेले माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ व ज्येष्ठ नेते शरद पवार चाकण येथील कार्यक्रमाच्या निमित्ताने एकाच व्यासपीठावर येणार त्यांच्यात काय चर्चा होणार अशा चर्चा रंगल्या होत्या. या चर्चांना माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी भाषणात पूर्णविराम दिला. यावेळी माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी भाषणात सांगितले की, 'या कार्यक्रमाला पवार साहेबांना बोलावलं हे योग्य झाल. पवार साहेब मुख्यमंत्री असताना भिडेवाड्याचे नूतनीकरणं केले. मंडल आयोगाची अंमलबजावणी पवारसाहेब यांनी केली. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव पवार साहेब यांनी दिले.महात्मा फुलेनी शेतकऱ्यांसाठी काम केले. झिरपे तलाव करा, शेतकऱ्यांना बि- बियाणे द्या हे महात्मा फुलें नी ब्रिटिश राजकर्त्यांना सांगितले. शेतकऱ्याला शिक्षित करावं, शिक्षणात शेतीचा समावेश करण्यासाठी ब्रिटिश सरकारकडे महात्मा फुलेनी पाठपुरावा केला. पशुहत्या बंद करावी. महात्मा फुले यांनी अनेक कामे केली.आमच्याच लोकांनी त्यांना विरोध केला.'या कार्यक्रमात माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळातील उल्लेखनीय कामांचे तोंड भरून कौतुक केले. शरद पवार यांच्याकडे पाहिल्यानंतर महात्मा फुलेंच्या विचारधारेची, त्यांच्यावरील अभ्यासाची जाणीव होते. पवार साहेब म्हणजे शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचाराच्या प्रेरणेने आचरण करून महापुरुषांच्या विचाराचा प्रसार करणारे जेष्ठ नेते आहेत.

# वाघोलीतील साई सत्यम पार्क परिसरात पिण्याचा पाण्याचा प्रश्न मार्गी; रामभाऊ दाभाडे यांच्या पाठपुराव्याला यश

**वाघोली । प्रतिनिधी**

परिसरातील साई सत्यम पार्क भागातील अनेक लोक वस्तीसाठी कमी प्रमाणात असणाऱ्या पाण्याच्या प्रश्नातून दिलासा मिळणार आहे. खराडी ते साई सत्यम पार्क पाण्याची लाईन कामासाठी जवळपास ५० लाखांचा निधी मंजूर झाला असून लवकरच कामाला सुरुवात होणार आहे. रामभाऊ दाभाडे यांच्या पाठपुराव्याला यश प्राप्त झाल्याने नागरिकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.



वाघोली तालुका हवेली येथील साई सत्यम पार्क, कावडे वस्ती, कोलते पार्क, गणेश पार्क, रोज गार्डन या भागातील लोकसंख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्यामुळे ग्रामपंचायत कडून होणारा पाण्याचा पुरवठा कमी पडू लागला होता. याबाबत परिसरातील नागरिकांनी माजी जिल्हा परिषद सदस्य रामभाऊ दाभाडे यांच्याकडे पाणी प्रश्न मांडला होता.

लोकसंख्या वाढीमुळे पूर्वीचे योजनेतून वाढीव पाण्याचा पुरवठा करणे शक्य नाही. त्यामुळे दाभाडे यांनी महानगरपालिका आयुक्त तसेच तत्कालीन आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्याकडे भामा आसखेड प्रकल्पातून मिळणाऱ्या पाण्याला विलंब होणार असल्याने खराडी येथून साई सत्यमपर्यंत पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकावी यासाठी पाठपुरावा केला होता. यासाठी पुणे महानगरपालिकेने आर्थिक विकास आराखड्यात ५० लाखांची तरतूद करून निविदा प्रक्रिया पूर्णत्वास आली आहे. या कामाची वर्क ऑर्डर प्राप्त झाले असून येत्या आठवडाभरात कामाला सुरुवात होणार आहे. यामुळे आता या भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे. याबाबत नागरिकांनी तत्कालीन आरोग्यमंत्री तानाजी सावंत, तत्कालीन आयुक्त, माजी जिल्हा परिषद सदस्य रामभाऊ दाभाडे यांचे आभार मानले आहेत.

# हरलेलो नाही, पुन्हा ताठ मानेने उभा राहील - माजी आमदार मोहिते

राजगुरुनगर : मी हरलेलो नाही, मी पुन्हा ताठ मानेने उभा राहील, राजकारणातील यश आणि अपयश हे पचवण्याची हिम्मत दिलीप मोहिते यांच्यात आहे. मी परत उभारी घेईन. जिथं चुकले ते दुरुस्त करील, असा विश्वास खेड-आळंदी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी दिला.






राजगुरूनगर शहरात माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या माध्यमातून नुकतेच बालजत्रा व खाऊ गल्ली जत्रेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जिल्हा दूध संघाचे संचालक अरुण चांभारे, तहसीलदार ज्योती देवरे, जिल्हा परिषद माजी सदस्य सुरेखा मोहिते पाटील, अनिल राक्षे, मंगल चांभारे, भाजप चे तालुका अध्यक्ष शांताराम भोसले, राष्ट्रवादी काँग्रेस खेड तालुका युवक अध्यक्ष वैभव घुमटकर, शहराध्यक्ष सागर सातकर, विद्यार्थी संघटनेचे तालुका अध्यक्ष सिद्धार्थ कांबळे, संतोष भांगे, पप्पू बनसोडे, हुतात्मा राजगुरू सोशल फाऊंडेशनचे अध्यक्ष बाळासाहेब सांडभोर, माजी अध्यक्ष ॲड. मनिषा टाकळकर, ॲड. सुनील वाळुंज, बाजार समितीचे माजी उपसभापती विठ्ठल वनघरे यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. मोहिते पाटील म्हणाले, नुकत्याच निवडणूक झाल्या आपल्याला अपयश आले अनेक कार्यकर्त्यांच्या मनात काही भावना होत्या असे कार्यक्रम होतील की नाही याबाबत शंका होत्या; मात्र जेजे आपण करणार आहोत ते नक्की केले जाणार आहे असा कार्यकर्त्यांना त्यांनी शब्द त्यांनी दिली. खंत एकच आहे, तालुक्याला मंत्रिपदाची संधी होती. ७५ वर्षांनी मंत्रिपदाची तालुक्याला संधी मिळणार होती. त्यातून तालुक्याचा अधिकचा विकास करता आला असता, असे त्यांनी नमूद केले.

# दुचाकी घेताना ग्राहकांना दोन हेल्मेट देणं अनिवार्य, पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे आदेश

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात अनेकदा हेल्मेटसक्ती झाली, पण नंतर ती शिथिल देखील झाली, त्यानंतर आता पुण्यात दुचाकीस्वार आणि मागे बसणाऱ्या व्यक्तीने देखील हेल्मेट घालावे यासाठी पुण्याच्या प्रादेशिक परिवहन कार्यालयाने नवी युक्ती शोधली आहे. पुण्यात दुचाकी विकणाऱ्या शोरूमला दुचाकी खरेदी केल्यानंतर हेल्मेट देण्यासाठी सक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे नवी दुचाकी विकताना ग्राहकांना दोन हेल्मेट देणे आता अनिवार्य असणार आहे. वारंवार होत असलेल्या अपघातांमुळे



होणारी जीवितहानी रोखण्यासाठी पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून मोठा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे यापुढे शोरूममधून दुचाकीची विक्री करणाऱ्यांना दोन हेल्मेट देणं बंधनकारक असणार आहे. मात्र, यामुळे दुचाकींच्या किमतीत काही प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे.

वाढणारे अपघात, गाड्यांची संख्या, वाहतूक कोंडी यामुळे नियम अधिक कडक करणं आवश्यक आहे. त्यासाठी आता पुण्यातील दुचाकीस्वारांसह मागे बसणाऱ्यांनी हेल्मेट नियमित घालावे यासाठी पुणे परिवहन विभागाने मोठे आदेश दिले आहेत. यासंबधीचे एक पत्रक देखील त्यांनी काढलं आहे.

पत्रकात काय म्हटलं आहे ?

भारतात व महाराष्ट्रात रस्ते अपघातात दुचाकी वाहनचालकांची बळींची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच दुचाकी अपघातामध्ये होणाऱ्या मृत्यूंची संख्या लक्षणीय आहे. दुचाकीस्वारांनी जर हेल्मेटचा वापर केला तर अपघातामध्ये होणा-या मृत्युंच्या संख्येमध्ये निश्चित घट होवू शकते. त्यामुळे वाहनचालकाने स्वतः आणि सोबत बसलेल्या व्यक्तीने रस्ता सुरक्षा मानकांची पूर्तता करणा-या हेल्मेटचा वापर करणे अत्यावश्यक आहे. तसेच केंद्रिय मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम १३८ नुसार नविन दुचाकी वाहन खरेदी करणाऱ्या ग्राहकांना, खरेदीवेळी वाहन वितरकाने दोन हेल्मेट पुरविणे आवश्यक आहे. याबाबत दुचाकी वितरकांना सुचना देण्यात आलेल्या आहेत. नविन दुचाकी खरेदी करणाऱ्या सर्व नागरीकांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, वाहन ताब्यात घेतेवेळी वाहन वितरकाकडून दोन हेल्मेट प्राप्त करून घ्यावीत, असं पत्रकामध्ये लिहलं आहे.

# पुणे पुस्तक महोत्सवातील गिनीज विक्रमात लोकमान्य'चा सहभाग

पुणे । प्रतिनिधी

वाचनसंस्कृती वाढवण्यासाठी राष्ट्रीय पुस्तक न्यास (नॅशनल बुक ट्रस्ट) पुणे महापालिका, लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप सोसायटी आणि इतर शासकीय, अशासकीय संस्थांच्या मदतीने आयोजित करण्यात आलेल्या पुणे पुस्तक महोत्सवाने चार जागतिक विक्रम नोंदवले आहेत.

फर्गसन महाविद्यालयाच्या मैदानावर पुणे पुस्तक महोत्सवाचे उद्घाटनाच्या पूर्वसंध्येला पुस्तकांचा वापर करून सरस्वती देवीची कलाकृती तयार करून गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड करण्यात आला. या विश्वविक्रमासाठी ४ हजार १८९ पुस्तकांचा वापर करण्यात



आला. नॅशनल बुक ट्रस्टच्या पुस्तकांनी तयार करण्यात आलेली ही कलाकृती एक हजार चौरस मीटरमध्ये साकारण्यात आली. या जागतिक विक्रमात लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप सोसायटी सहभागी झाली होती.

विश्वविक्रमासाठीची कलाकृती किमान एक हजार चौरस मीटरची असणे, सुस्थितीत असलेल्या पुस्तकांचा वापर, जागा रिकामी न राहणे, पाच वेगवेगळे रंग असणे अशा विविध निकषांवर या कलाकृतीचे मूल्यमापन करण्यात आले. त्यानुसार साकारलेली कलाकृती पात्र ठरवून गिनीज विश्वविक्रम नोंदवला गेला.

# मराठी पत्रकार परिषदेचे नवे पदाधिकारी जाहीर

### अध्यक्ष मिलींद अष्टीवकर, उपाध्यक्ष गणेश मोकाशी तर सहप्रसिद्धी प्रमुखपदी भरत निगडे

मुंबई - मराठी पत्रकार परिषदेचे नवे पदाधिकारी सन २०२४ ते २०२६ या वर्षासाठी जाहीर करण्यात आले असून त्यात - एस.एम.देशमुख : मुख्य विश्वस्त, किरण नाईक : विश्वस्त, शरद पाबळे : विश्वस्त, मिलिंद अष्टीवकर : अध्यक्ष, शिवराज काटकर : कार्याध्यक्ष, सुरेश नाईकवाडे : सरचिटणीस, मन्सूरभाई शेख : कोषाध्यक्ष, उपाध्यक्ष सर्वश्री गो. पी. लांडगे, गणेश मोकाशी, प्रकाश कांबळे, हेमंत वणजू,अविनाश भांडेकर,




चंद्रकांत बर्दे, चिटणीस सर्वश्री- दीपक कैतके, पी. पी. कुलकर्णी, रवी उबाळे, प्रदीप घुमटवार, शिखरचंद बागरेचा, मनोज खांबे, सचिन शिवशेट्टे, अमोल खरे, चंद्रकांत क्षीरसागर, संदीप कुलकर्णी : राज्य प्रसिध्दीप्रमूख, भरत निगडे : सहायक राज्य प्रसिध्दी प्रमूख , शोभा जयपूरकर : राज्य महिला आघाडी अध्यक्ष, अनिल वाघमारे : डिजिटल मिडिया परिषद अध्यक्ष, सनी शिंदे : डिजिटल मिडिया कार्याध्यक्ष, अनिल उंबरकर : उपाध्यक्ष डिजिटल मिडिया परिषद यांचा समावेश करण्यात आला आहे.

# वाघोलीत नगर रस्त्यावर अल्पवयीन मुलाची लोखंडी रॉडने निर्घूणपणे हत्या ; परिसरात भीतीचे वातावरण

पुणेः गेल्या काही दिवसांपासून शहरात गुन्हेगारीने डोकं वर काढले असून रोज अनेक थरारक अशा गुन्ह्याच्या घटना घडत आहेत. वाघोली येथील नगर रस्त्यावरील वाघेश्वरनगर भागात देखील अशीच थरारक खूनाची घटना घडली आहे. मुलीसोबत बोलत असल्याच्या रागातून एका अल्पवयीन मुलाची लोखंडी रॉड आणि दगडाने अत्यंत निर्घूणपणे हत्या करण्यात आल्याची प्राथमिक माहिती सांगण्यात येत आहे. ही घटना मंगळवारी मध्यरात्री साडे बाराच्या सुमारास घडली आहे.




या प्रकरणी पोलिसांनी लक्ष्मण पेटकर (वय ६०), नितीन पेटकर (वय ३१) आणि सुधीर पेटकर (वय ३२) यांना ताब्यात घेतले असून, त्यांच्यावर वाघोली पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गणेश वाघू तांडे (१७) असे हत्या झालेल्या अल्पवयीन मुलाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश तांडे याचे कुटूंब व पेटकर कुटूंब हे एकाच भागात राहण्यास आहे. गणेश हा पेटकर यांच्या मुलीशी बोलत असल्याचा संशय कुटूंबियांना होता. त्याचा राग आरोपींच्या मनात असल्याने ही हत्या करण्यात आलेचे सांगण्यात आले आहे.

**घटनेने परिसरात भीतीचे वातावरण**

मंगळवारी रात्री साडे बाराच्या सुमारास गणेश हा नेहमीप्रमाणे मित्रासोबत वस्तीत थांबलेला असताना अचानक गणेशला तिघांनी गाठत त्याच्यावर लोखंडी रॉड आणि दगडाने हल्ला चढविला. हा हल्ला इतका भयंकर होता की या घटनेत गणेशचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती वाघोली पोलिसांना मिळाताच पोलीसांनी घटनास्थळी धाव घेतली. या प्रकरणी तिघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या हत्येच्या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण असून परिसरावर शोककळा पसरली आहे.

# शिवसेनेच्या मदतीशिवाय पुण्याचा महापौर होणार नाही; प्रमोद भानगिरे यांचे मत

पुणे: लोकसभा आणि विधानसभेच्या फॉर्म्युल्यानुसारच आगामी महापालिकेची निवडणूक महायुती लढणार आहे. महापालिकेच्या २०१७ साली झालेल्या निवडणुकीत शिवसेनेच्या धनुष्यबाण चिन्हावर ज्या जागा निवडून आल्या, त्या जागांसह ४० जागांसाठी आमचा आग्रह राहणार आहे. त्यामुळे पुण्याचा महापौर शिवसेनेच्या मदतीशिवाय होणार नाही, असे मत शिवसेना शहरप्रमुख प्रमोद (नाना) भानगिरे यांनी व्यक्त केले.

सारसबागेजवळील शिवसेना कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत भानगिरे बोलत होते. या वेळी जिल्ह्याचे सहसंपर्कप्रमुख अजय भोसले, महिला आघाडी सहसंपर्कप्रमुख सुदर्शना त्रिगुनाईत, जिल्हा महिला आघाडी संपर्कप्रमुख गीतांजली ढोणे आदी उपस्थित होते. भानगिरे म्हणाले, महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने शहरात शिवसेनेची पक्षबांधणी सुरू असून, विभागवार बैठका घेतल्या जात आहेत. पक्षासाठी अनुकूल असणार्या प्रभागांत सर्व्हे केला जात आहे. आगामी काळात महायुतीमधील व महाविकास आघाडीमधील नेते शिवसेना पक्षात प्रवेश करणार आहेत. महापालिकेची निवडणूक युतीमध्ये लढायची की स्वबळावर, याचा निर्णय वरिष्ठ नेते घेतील. त्यांच्या निर्णयानुसार आम्ही निवडणुकीला सामोरे जाणार आहोत. महायुती म्हणून निवडणूक लढत असताना ४० ते ५० जागांची मागणी आम्ही करणार आहोत, असेही ते म्हणाले.

# इंद्रायणी प्रदूषणमुक्ती एका दिवसाचा कार्यक्रम नाही : मुख्यमंत्री फडणवीस

आळंदी । प्रतिनिधी

इंद्रायणी नदी प्रदूषण मुक्तीबाबत वारंवार विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांवर अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सडेतोड उत्तर दिले असून इंद्रायणी नदी प्रदूषण मुक्ती म्हणजे एक दिवसाचा कार्यक्रम नसल्याचे म्हटले आहे. नदी प्रदूषण मुक्तीसाठी व्यापक कार्यक्रम राबवावा लागणार असून त्याची प्रक्रिया सुरू आहे. इंद्रायणी नदीत सगळ्या शहराचे, उद्योगाचे, गावांचे सांडपाणी प्रक्रिया न करता येऊन मिळत आहे. त्यावर प्रक्रिया होऊन शुद्ध पाणी नदीत सोडले जाईल, यासाठी कार्यक्रम राबविण्यात येणार असून महानगरपालिका, ग्रामपंचायत, नगरपरिषद यांना निधी देण्यात येणार आहे. त्यासाठीची प्रक्रिया सुरू आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी आळंदी येथे



सांगितले.

स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांच्या आश्रमातील संत कृतज्ञता संवाद कार्यक्रमाकरिता मुख्यमंत्री आळंदी आले होते. यावेळी त्यांनी संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधीचे दर्शन घेतले. त्यांच्यासमवेत केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहळ, राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, जिल्हाधिकारी डॉ. जितेंद्र डूडी, आमदार हेमंत रासने, उमाताई खापरे यादेखील उपस्थित होत्या. पांडुरंगाच्या आशीर्वादाने एक मोठा विजय आम्हाला प्राप्त झाला आहे. त्यानंतर आळंदीला येऊन माऊलींचा आशीर्वाद घेण्याची संधी मिळाली ही प्रत्येकासाठी भाग्याची गोष्ट असते, सुखाचा क्षण असतो. तो क्षण मला अनुभवता आला याचा मला आनंद आहे. निश्चितपणे आमची जी संत परंपरा आहे, ज्ञानेश्वर माऊलींपासून जगद्गुरु तुकाराम महाराजांपर्यंत हा जो विचार आहे या विचारानेच महाराष्ट्र पुढे गेला आहे आणि पुढे जात राहील. याच विचाराची आठवण आम्हाला होत राहावी म्हणून प्रफुल्लित होण्यासाठी आम्ही याठिकाणी येत असतो, असे फडणवीस म्हणाले. यावेळी आळंदी देवस्थान तर्फे प्रमुख विश्वस्त ड. राजेंद्र उमाप, विश्वस्त योगी निरंजननाथ, विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे यांनी मुखमंत्री यांचा भगवा फेटा, शाल, श्रीफळ, उपरणे, तुळशी हार व माऊलींची प्रतिमा, तसेच ज्ञानेश्वरी देत सन्मान केला. यावेळी देवस्थानचे प्रमुख व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, प्रसिध्दी प्रमुख उमेश बागडे व इतर मान्यवर उपस्थित होते.

# केअरटेकर तरुणानेच ज्येष्ठाला लुबाडले

पुणे । प्रतिनिधी

शुश्रूषा करण्यासाठी ठेवलेल्या केअरटेकर तरुणाने ज्येष्ठाला नॉयलॉन दोरीने बांधून रोकड आणि मोबाईल लुटून नेल्याची घटना कोरेगाव पार्क भागात घडली. या प्रकरणी पोलिसांनी तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत एका ५६ वर्षीय व्यावसायिकाने कोरेगाव पार्क पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. चिंटू चतुर्वेदी (वय १९, रा. कुम्हारी, जि. सतना, मध्य प्रदेश) असे गुन्हा दाखल केलेल्याचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार व्यावसायिक घोरपडीतील सोपानबाग परिसरात राहतात. त्यांचे वडील कोरेगाव पार्कमधील अग्रसेन




सोसायटीमध्ये राहतात. त्यांची शुश्रूषा करण्यासाठी चतुर्वेदीला केअरटेकर म्हणून ठेवले होते. त्याने बुधवारी (ता. १) नॉयलॉनच्या दोरीने ज्येष्ठाचे हात-पाय बांधले. त्यानंतर चाकूचा धाक दाखवून ३२ हजारांची रोकड आणि मोबाईल घेउन तो पसार झाला. तक्रारदार वडिलांना भेटण्यासाठी सायंकाळी घरी गेले. तेव्हा आरोपी चतुर्वेदीने तक्रारदाराच्या वडिलांना चाकूच्या धाकाने लुटल्याचे उघडकीस आले. पोलिस पसार झालेल्या आरोपीचा शोध घेत आहेत.